त्या पुढे म्हणाल्या की, भांडवली व्यवस्था धर्म, जात, वर्ण, प्रदेश, लिंगभेदाचे गौरविकरण करते. त्यामुळे अमानवी मूल्यव्यवस्था प्रबळ होते. प्रेम विवाह करून जोडीदार निवडला यामुळे बहिणीचे कोयत्याने मुंडके छाटणारा व त्याची सेल्फी काढणारा समाज याचे द्योतक आहे. प्रत्येक माणसाचे स्वातंत्र्य व हक्क मानवी हक्कात जपण्याचे अंतर्भूत आहे. त्यासाठी सजग, संवेदनशील समाजाची उभारणी करण्याची गरज आहे. भारतीय संविधानात मानवी हक्कांसोबतच कर्तव्यही अंतर्भूत केलेले आहेत. महिला, बालके व पुरुष यांना समानतेने वागविण्याची गरज आहे. यावेळी कार्यक्रमास डॉ.आर.के.पवार, डॉ.बी.जे.देशमुख, डॉ.प्रकाश महाजन, प्रा.अशोक मोसीकर, डॉ.एस.व्ही.कशिद, डॉ.रणजित पवार आदी उपस्थित होते.

ePaper देशोन्नती Sat, 11 December 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/64895819

Shivaji College Library Kannad

दैनिक दिव्य मराठी

औरंगाबाद, शनिवार, ११ डिसेंबर, २०२१ | ३

# भांडवलशाहीमुळे जगभरात मानवी हक्कांची पायमल्ली : डॉ. अहिरे

प्रतिनिधी | कन्नड

जगभरात भांडवलशाही प्रबळ होत आहे. बहुसंख्याकांचे शोषण करूनच मूठभरांना वैभव प्राप्त होते. या भांडवलशाहीच्या नियमाने जगभरात मानवी हक्कांची पायमल्ली होत आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य प्रो. डॉ. प्रतिभा अहिरे यांनी केले. त्या शिवाजी महाविद्यालयात लोकप्रशासन विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनाच्या निमित्त आयोजित व्याख्यानात बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य विजय भोसले होते. या वेळी डॉ. आर. के. पवार, डॉ. बी. जे. देशमुख, डॉ. प्रकाश महाजन, प्रा. अशोक भोसीकर, डॉ. एस. व्ही. काशीद, डॉ. रणजित पवार उपस्थित होते. अहिरे म्हणाल्या की, भांडवली व्यवस्था धर्म, जात, वर्ण, प्रदेश, लिंगभेदाचे गौरविकरण करते. त्यामुळे अमानवी मूल्यव्यवस्था प्रबळ होते. प्रेमविवाह करून जोडीदार निवडला. यामुळे बहिणीचे कोयत्याने मुंडके छाटणारा व त्याची सेल्फी काढणारा समाज याचे द्योतक आहे. प्रत्येक माणसाचे स्वातंत्र्य व हक्क मानवी हक्कात जपण्याचे अंतर्भूत आहे. त्यासाठी सजग, संवेदनशील समाजाची उभारणी करण्याची गरज आहे. भारतीय संविधानात मानवी हक्कांसोबतंच कर्तव्यही अंतर्भूत केलेले आहेत. महिला,बालके व पुरुष यांना समानतेने वागविण्याची गरज आहे. प्राचार्य भोसले म्हणाले की, व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास करण्यासाठी जागतिक पातळीवर मानवी हक्काचा जाहीरनामा लोकशाही प्रधान राष्ट्रांनी स्वीकार केला. त्यामुळे प्रत्येकाला सन्मानाने जगण्यासाठी मूलभूत हक्क बहाल केले. परंतु आपण आपल्या हक्काबरोबर कर्तव्याशी बांधिलकी दाखविली पाहिजे. तरच मूलभूत हक्काशी आग्रही असण्यास नैतिक अधिष्ठान प्राप्त होईल म्हणून मानवी हक्काला कर्तव्याची जोड द्यावी. लोकप्रशासन विभागाच्या वतीने जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त आयोजित \'राष्ट्रीय महिला आयोग आणि महिला विषयक कायदे' या विषयावरील स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. सूत्रसंचलन करून आभार डॉ. संजय भालेराव यांनी मानले.

## शिवाजी महाविद्यालयात मानवी हक्क दिन साजरा




आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनाच्या निमित्ताने शिवाजी महाविद्यालयात मार्गदर्शन करताना प्रो.डॉ. प्रतिभा अहिरे

34

Shivaji College Library * Kannad

महाराष्ट्र टाइम्स

दि. 11/12/2021

# जनरल बिपिन रावत यांना श्रद्धांजली

**कन्नड :** हवाई दलाचे हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या भीषण अपघातात तिन्ही संरक्षण दलाचे प्रमुख (सीडीएस) जनरल बिपिन रावत, त्यांच्या पत्नी व सहकाऱ्यांचे निधन झाले. या सर्वांना शहरातील शिवाजी महाविद्ययालयातील एनसीसी विभागाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एन भोसले, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, एनएसएस विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. अशोक भोसीकर, एनसीसी विभाग प्रमुख डॉ. आर. व्ही. अहिरराव, एनसीसी छात्र उपस्थित होते.

Shivaji College Library Kannad

लोकमत समाचार | औरंगाबाद, शनिवार 11 दिसंबर 2021

**मार्गदर्शन** • कन्नड़ के शिवाजी महाविद्यालय में मानवाधिकार दिवस पर व्याख्यान का आयोजन

# पूंजीवाद के कारण कुचले जा रहे मानवाधिकार : प्रतिभा अहिरे

कन्नड़ | 10 दिसंबर | लोस सेवा

पूंजीवाद आज पूरी दुनिया में ताकतवर होता जा रहा है और इसी कारण दुनियाभर में मानवाधिकारों को कुचला जा रहा है. पूंजीवाद में गिने-चुने लोगों को ही महत्व मिलता है, शेष लोगों का केवल शोषण ही होता है. यह बात डॉ बाबासाहब आंबेडकर मराठवाड़ा विश्वविद्यालय की प्रबंधन समिति की सदस्य डॉ प्रतिभा अहिरे ने कही. वह शुक्रवार को स्थानीय शिवाजी कॉलेज में 'विश्व मानवाधिकार दिवस' के मौके पर आयोजित कार्यक्रम में बोल रही थीं.

महाविद्यालय के लोक प्रशासन विभाग की ओर से 'विश्व मानवाधिकार दिवस' के उपलक्ष्य में आयोजित व्याख्यान में डॉ अहिरे ने कहा कि पूंजीवाद की व्यवस्था में धर्म, जाति, वर्ण, क्षेत्र व लिंग का महिमामंडन किया जाता है. इसी कारण समाज में अमानवीय मूल्यों का बोलबाला है. मानव अधिकारों में



कन्नड़ के शिवाजी महाविद्यालय में शुक्रवार को 'विश्व मानवाधिकार दिवस' के अवसर पर आयोजित कार्यक्रम को संबोधित करती हुईं डॉ प्रतिभा अहिरे.

प्रत्येक मनुष्य की स्वतंत्रता की सुरक्षा निहित है. इसके लिए एक जागरूक, संवेदनशील समाज का निर्माण आवश्यक है.

अध्यक्षता कर रहे प्राचार्य विजय भोसले ने कहा कि मानव अधिकारों की सार्वभौम घोषणा को लोकतांत्रिक राष्ट्रों ने व्यक्ति के समग्र विकास के लिए अपनाया था. इसलिए सभी को सम्मान के साथ जीने का मौलिक अधिकार दिया गया है. हमें अपने अधिकारों और कर्तव्यों के प्रति प्रतिबद्धता दिखानी चाहिए, मानवाधिकारों को कर्तव्य से जोड़ा जाना चाहिए. लोक प्रशासन विभाग के तत्वावधान में विश्व मानवाधिकार दिवस के अवसर पर राष्ट्रीय महिला एवं महिला कानून आयोग विषय पर प्रतियोगी परीक्षा आयोजित की गई.

कार्यक्रम में डॉ आरके पवार, डॉ बीजे देशमुख, डॉ प्रकाश महाजन, प्रा अशोक भोसीकर, डॉ एसवी काशिद और डॉ रंजीत पवार मौजूद थे. संचालन संजय भालेराव ने किया.

36

Shivaji College Library * Kannad

दैनिक दिव्य मराठी

दिव्य मराठी, शनिवार, ११ डिसेंबर २०२१

## कन्नड येथे जनरल बिपिन रावत यांना श्रद्धांजली

प्रतिनिधी । कन्नड

तामिळनाडूतील कुन्नूर येथील हवाई दलाचे हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या भीषण अपघातात संरक्षण दलाचे प्रमुख (सी.डी.एस.) जनरल बिपिन रावत, त्यांच्या पत्नी व सहकारी यांचे निधन झाले. एनसीसी विभाग शिवाजी महाविद्यालय कन्नड तर्फे अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. एन भोसले, उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर, प्रा.अशोक भोसीकर, डॉ. पी.बी. महाजन, डॉ. विजय मातकर, डॉ. मीना वडगुळे आदी उपस्थित होते.

Shivaji College Library * Kannad

सोलापूर तरुण भारत

रविवार, दि. १२ डिसेंबर २०२१

## बिपिन रावत व इतर सहकाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण

**तभा, वृत्तसेवा**

**कन्नड, दि. ११ डिसेंबर -**

तामिळनाडूतील कुन्नूर येथील हवाई दलाचे हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या भीषण अपघातात संरक्षण दलाचे प्रमुख (सी.डी. एस.) जनरल बिपिन रावत त्यांच्या पत्नी व सहकारी यांचे दुःखद निधन झाले. एनसीसी विभाग शिवाजी महाविद्यालय कन्नड तर्फे अभिवादन करून श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही. एन.भोसले, उपप्राचार्य डॉ.बी. के. मगर, एन.एस.एस.विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा.अशोक भोसिकर, डॉ.महाजन, नॅक समन्वयक डॉ.विजय मातकर, वाणिज्य विभाग प्रमुख व डॉ.मीना वडगुळे, डॉ.अहिरे प्रतिभा, व्यवस्थापन सदस्य डॉ.बा. आं.म.यु. औरंगाबाद तसेच एन.सी.सी. विभाग प्रमुख डॉ. अहिरराव आर. व्ही. तसेच सर्व एन सी सी कॅडेड उपस्थित होते.

epaper.saamana.com
रविवार, दि. १२ डिसेंबर २०२१ सामना

## शिवाजी महाविद्यालयात मानवी हक्क दिन साजरा

**कन्नड** : जगभरात भांडवलशाही प्रबळ होत आहे. बहुसंख्यांकांचे शोषण करूनच मूठभरांना वैभव प्राप्त होते. या भांडवलशाहीच्या नियमाने जगभरात मानवी हक्कांची पायमल्ली होत आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या प्रो. डॉ. प्रतिभा अहिरे यांनी शिवाजी महाविद्यालयात बोलताना केले. शिवाजी महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय मानवी हक्कदिनाच्या निमित्ताने डॉ. अहिरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात बोलताना प्राचार्य विजय भोसले म्हणाले की, व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास करण्यासाठी जागतिक पातळीवर मानवी हक्काचा जाहीरनामा लोकशाहीप्रधान राष्ट्रांनी स्वीकार केला. त्यामुळे प्रत्येकाला सन्मानाने जगण्यासाठी मूलभूत हक्क बहाल केले. परंतु आपण आपल्या हक्काबरोबर कर्तव्याशी बांधिलकी दाखविली पाहिजे. यावेळी 'राष्ट्रीय महिला आयोग आणि महिला विषयक कायदे' या विषयावरील स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. या कार्यक्रमास डॉ. आर. के. पवार, डॉ. बी.जे. देशमुख, डॉ. प्रकाश महाजन, प्रा. अशोक भोसीकर, डॉ. एस. व्ही. काशिद डॉ. रणजित पवार, डॉ. संजय भालेराव आदी उपस्थित होते.

Shivaji College Library
Kannad

आदर्श गावकरी
www.adarshgavkari.com
सोमवार, दि. १३ डिसेंबर २०२१ ७

## प्रबळ भांडवलशाहीमुळे जगभरात मानवी हक्काची पायमल्ली : डॉ. प्रतिभा अहिरे

**कन्नड :** जगभरात भांडवलशाही प्रबळ होत आहे. बहुसंख्यांचे शोषण करूनच मुठभरांना वैभव प्राप्त होते. या भांडवलशाहीच्या नियमाने जगभरात मानवी हक्कांची पायमल्ली होत आहे. असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य प्रो. डॉ. प्रतिभा अहिरे यांनी केले. शिवाजी महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागातर्फे आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनाच्या निमित्ताने डॉ. अहिरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. त्या पुंढे म्हणाल्या की, भांडवली व्यवस्था धर्म, जात, वर्ण, प्रदेश, लिंगभेदाचे गौरविकरण करते. त्यामुळे अमानवी मूल्यव्यवस्था प्रबळ होते. प्रेम विवाह करून जोडीदार निवडला यामुळे बहिणीचे कोयत्याने मुंडके छाटणारा व त्याची सेल्फी काढणारा समाज याचे द्योतक आहे. प्रत्येक माणसाचे स्वातंत्र्य व हक्क मानवी हक्कात जपण्याचे अंतर्भूत आहे. त्यासाठी सजग,संवेदनशील समाजाची उभारणी करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य विजय भोसले होते. ते अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास करण्यासाठी जागतिक पातळीवर मानवी हक्काचा जाहीरनामा लोकशाही प्रधान राष्ट्रांनी स्वीकार केला. त्यामुळे प्रत्येकाला सन्मानाने जगण्यासाठी मूलभूत हक्क बहाल केले. परंतू आपण आपल्या हक्काबरोबर कर्तव्याशी बांधिलकी दाखविली पाहिजे . तरच मूलभूत हक्काशी आग्रही असण्यास नैतिक अधिष्ठान प्राप्त होईल असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी डॉ. आर. के. पवार, डॉ. बी. जे. देशमुख, डॉ. प्रकाश महाजन, प्रा. अशोक भोसीकर, डॉ. एस. व्ही. काशिद, डॉ. रणजित पवार, डॉ. संजय भालेराव आदी उपस्थित होते.

दि. 14/12/2021

# नवे शैक्षणिक धोरण नव्या गुलामगिरी कडे घेऊन जाणारे - प्रा.डॉ.अनिल डोंगरे

Shivaji College Library * Kannad *

**दैनिक देशोन्नती कन्नड**

कन्नड ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या उद्दिष्ट आणि ध्येयपूर्तीसाठी शिक्षणाचा आग्रह धरला त्यापासून आजच्या शैक्षणिक धोरणाने फारकत घेतली आहे. नव्या गुलामगिरीकडे घेऊन जाणारे हे धोरण आहे असे परखड प्रतिपादन कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे डॉ. आंबेडकर विचारधारा, प्रशालेचे संचालक प्रा.डॉ.अनिल डोंगरे यांनी केले. शिवाजी महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'वर्तमान काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रस्तुतता' या विषयावर प्रा.डोंगरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, आज जगासमोर तंत्रज्ञान, पर्यावरण आणि लोकशाही या क्षेत्रात नवे आव्हान उभे राहिले आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे आंबेडकरवादात आहेत. पण आंबेडकरवाद विशिष्ट जातिचे म्हणून अनुल्लेखिले जात आहे. डॉ.आंबेडकरांनी साऊथ ब्युरो, सायमन कमिशन, गोलमेज परिषदेत सातत्याने शिक्षणाची मागणी केली. शिक्षण माणसाला जबाबदार, संवेदनशील बनविण्याची प्रक्रिया आहे, या दोन घटकांमुळेच व्यक्तीची कार्यक्षमता वाढते, व्यक्तीची कार्यक्षमता वाढली तरच सामाजिक कार्यक्षमता वाढते हे त्यांनी जाणले होते. आजचे केंद्रीय शैक्षणिक धोरण बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक धोरणाच्या विपरीत आहे. भारतीय संविधानाला अपेक्षित शैक्षणिक धोरण व शिक्षणप्रणाली अंगिकारण्याची गरज आहे. अन्यथा पुन्हा गुलाम समाज अस्तित्वात येईल. युवक व विद्यार्थ्यांनी सजग होऊन हे आव्हान परतून लावावे असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.प्रतिमा अहिरे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.सिताराम मोगल यांनी केले.

## निधन

दि. 14/12/2021

दैनिक लोकपत्र
भूमिपुत्रांचा मित्र!

# नवे शैक्षणिक धोरण नव्या गुलामगिरी कडे घेऊन जाणारे: डॉ अनिल डोंगरे

**कन्नड/प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या उद्दिष्ट आणि ध्येयपूर्तीसाठी शिक्षणाचा आग्रह धरला त्यापासून आजच्या शैक्षणिक धोरणाने फारकत घेतली आहे, नव्या गुलामगिरीकडे घेऊन जाणारे हे धोरण आहे असे परखड प्रतिपादन कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे डॉ. आंबेडकर विचारधारा ,प्रशालेचे संचालक प्रो.डॉ. अनिल डोंगरे यांनी केले. शिवाजी महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'वर्तमान काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रस्तुतता'या विषयावर प्रो.डोंगरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की,आज जगासमोर तंत्रज्ञान, पर्यावरण आणि



लोकशाही या क्षेत्रात नव्हे आव्हान उभे राहिले आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे आंबेडकरवादात आहेत. पण आंबेडकरवाद विशिष्ट जातिचे म्हणून अनुल्लेखिले जात आहे. डॉ. आंबेडकरांनी साऊथ ब्युरो,सायमन कमिशन, गोलमेज परिषदेत सातत्याने शिक्षणाची मागणी केली. शिक्षण माणसाला जबाबदार,समर्थ अनुभव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रतिभा अहिरे यांनी केले.त्या म्हणाल्या की,विद्यार्थी आणि युवकांनी देशापुढील आव्हाने समजून घ्यावेत यासाठी वर्षभर व्याख्याने व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांनी याचा फायदा घ्यावा. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. बी. के.मगर होते.ते अध्यक्षिय भाषणात म्हणाले की,विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आचरणात आणावे.समतामूलक समाजच विकास साधू शकतो.सुत्रंसंचालन प्रा.सिताराम मोगल यांनी केले.याप्रसंगी प्रा.अशोक भोसिकर,प्रा.स्वाती भोसले, प्रा. अलका गडकरी, शांताराम तायडे,डॉ. संजय भालेराव, वसंत बोरसे,राजू शेलार, आनंद जाधव,प्रा.शिवाजी हुसे आदिंसह मोठ्या संख्येने विद्यार्थी,प्राध्यापक उपस्थित होते.आभार डॉ. प्रकाश खेत्री यांनी मानले.

Shivaji College Library * Kannad *

40

लोकमत समाचार
औरंगाबाद • बुधवार, 14 दिसंबर 2021

Shivaji College Library Kannad

**नसीहत** • 'डॉ बाबासाहब आंबेडकर के विचारों की प्रस्तुति' के संबंध में व्याख्यान का आयोजन

# नई शिक्षा नीतियां गुलामी की ओर ले जाती हैं : अनिल डोंगरे

कन्नड़ | 14 दिसंबर | लोस सेवा

आज की शिक्षा नीति उन लक्ष्यों और उद्देश्यों से भटक गई है, जिससे भविष्य का निर्माण होता है. यही वजह है कि विद्यार्थी दिशाहीन होते जा रहे हैं. डॉ बाबासाहब आंबेडकर ने सही शिक्षा पर जोर दिया था. यह विचार प्रो डॉ अनिल डोंगरे ने व्यक्त किए.

डोंगरे हाल ही में शिवाजी कॉलेज के समाजशास्त्र विभाग की ओर से 'डॉ बाबासाहब आंबेडकर के विचारों की प्रस्तुति' के संबंध में आयोजित व्याख्यान को संबोधित कर रहे थे. उन्होंने कहा कि आज दुनिया के सामने चुनौती प्रौद्योगिकी, पर्यावरण और लोकतंत्र के क्षेत्र में नहीं है. इन सभी सवालों के जवाब आंबेडकरवाद में है. लेकिन आंबेडकरवाद को एक विशेष जाति के रूप में संदर्भित किया जा रहा है. डॉ आंबेडकर ने साउथ ब्यूरो, साइमन कमीशन, गोलमेज सम्मेलन में लगातार शिक्षा के प्रचार-प्रसार की मांग की. आज की केंद्रीय शिक्षा नीति बाबासाहब की शैक्षिक नीति के विपरीत है. यहां तक कि शिक्षा को सबसे महंगा बनाया जा रहा है. इसके साथ ही एक विचारहीन और




कन्नड़ के शिवाजी कॉलेज में हाल ही में आयोजित व्याख्यान को संबोधित करते हुए प्रो अनिल डोंगरे.

असंवेदनशील समाज बनाने के लिए सस्ता मोबाइल डेटा बनाया जा रहा है. एक ईमानदार, निष्पक्ष, आत्मनिर्भर समाज ही स्वतंत्र होता है.

प्रस्तावना में डॉ बाबासाहब आंबेडकर मराठवाड़ा विश्वविद्यालय की प्रबंधन परिषद सदस्य प्रतिभा अहिरे ने कहा कि देश के सामने आने वाली चुनौतियों को समझने के लिए विद्यार्थियों और युवाओं के लिए साल भर व्याख्यान और विभिन्न गतिविधियों का आयोजन किया जाता है. जिसका विद्यार्थियों को लाभ उठाना चाहिए. कार्यक्रम की अध्यक्षता करते हुए उप प्राचार्य डॉ बीके मगर ने कहा कि विद्यार्थियों को चाहिए कि वे बाबासाहब आंबेडकर के विचारों को रोज के व्यवहार तथा अपनी जिंदगी में लाएं. तभी समतावादी समाज का विकास हो सकता है. कार्यक्रम में प्रो सीताराम मुगल, प्रो अशोक भोसीकर, प्रो स्वाति भोसले, प्रो अलका गड़करी, शांताराम तायड़े, डॉ संजय भालेराव, वसंत बोरसे, राजू शेलार, आनंद जाधव, प्रो शिवाजी हुसे सहित बड़ी संख्या में विद्यार्थी एवं प्राध्यापक उपस्थित थे. संचालन सीताराम ने किया और आभार प्रकाश खेतड़ी ने माना.

41

सकाळ

औरंगाबाद, बुधवार,
१५ डिसेंबर २०२१

Shivaji College Library
Kannad

# नवे शैक्षणिक धोरण गुलामगिरीकडे घेऊन जाणारे

## डॉ. अनिल डोंगरे : कन्नडमधील शिवाजी महाविद्यालयात कार्यक्रम

कन्नड, ता. १४ (बातमीदार) : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या उद्दिष्ट आणि ध्येयपूर्तीसाठी शिक्षणाचा आग्रह धरला त्यापासून आजच्या शैक्षणिक धोरणाने फारकत घेतली आहे, नव्या गुलामगिरीकडे घेऊन जाणारे हे धोरण आहे. असे परखड मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे डॉ. आंबेडकर विचारधारा प्रशालेचे संचालक प्रो. डॉ. अनिल डोंगरे यांनी व्यक्त केले.



कन्नड : आयोजित कार्यक्रमात डॉ. अनिल डोंगरे, प्रा. अशोक भोसिकर, अलका गडकरी व इतर.

शहरातील शिवाजी महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'वर्तमान काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रस्तुतता' या विषयावर सोमवारी (ता. १३) श्री. डोंगरे बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आचरणात आणावे, असे आवाहन केले. श्री. डोंगरे म्हणाले, "आज जगासमोर तंत्रज्ञान, पर्यावरण आणि लोकशाही या क्षेत्रात नव्हे आव्हान उभे राहिले आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे आंबेडकरवादात आहेत. डॉ. आंबेडकरांनी साऊथ ब्युरो, सायमन कमिशन, गोलमेज परिषदेत सातत्याने शिक्षणाची मागणी केली. शिक्षण माणसाला जबाबदार, संवेदनशील बनविण्याची प्रक्रिया आहे, या दोन घटकांमुळेच व्यक्तीची कार्यक्षमता वाढते, व्यक्तीची कार्यक्षमता वाढली तरच सामाजिक कार्यक्षमता वाढते हे त्यांनी जाणले होते. आजचे केंद्रीय शैक्षणिक धोरण बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक धोरणाच्या विपरीत आहे. शिक्षण सर्वाधिक महाग व मोबाईल डाटा स्वस्त करून विचार व संवेदनाहीन समाज निर्माण करण्यात येत आहे. प्रामाणिक, निरपेक्ष, आत्मनिर्भर समाजच स्वतंत्र असतो. लोकशाही जिवंत ठेवणारे सहजीवन देशात नाही. डॉ. आंबेडकरांनी शिक्षण समर्थ अनुभव देते, या अनुभवाची पुनर्रचना करणे हे शिक्षणाचे उद्दिष्टे असते, असे स्पष्ट केले होते. समर्थ अनुभव पुढच्या अनुभवाकडे नेतो यातून नवे उद्दिष्टे मिळते, ही प्रक्रिया आजच्या शैक्षणिक धोरणात खंडित झाली आहे". या प्रसंगी प्रा. अशोक भोसिकर, प्रा. स्वाती भोसले, प्रा. अलका गडकरी, शांताराम तायडे, डॉ. संजय भालेराव, वसंत बोरसे, राजू शेलार, आनंद जाधव, प्रा. शिवाजी हुसे आदी उपस्थित होते. डॉ. प्रतिभा अहिरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश खेत्री यांनी आभार मानले.

Shivaji College Library * Kannad *

दैनिक दिव्य मराठी

दिव्य मराठी, शुक्रवार, १७ डिसेंबर २०२१

# कर्मचाऱ्यांनी काळया फिती लाऊन शासनाचा निषेध



कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लाऊन केला शासनाचा निषेध केला.

प्रतिनिधी । कन्नड

शासनाच्या वेळ काढु धोरणामुळे महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी महासंघ यांच्या माध्यमातून शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लाऊन शासनाचा निषेध केला. महासंघाच्या निर्णयानुसार शिवाजी महाविद्यालयातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्राचार्यांना निवेदन देऊन दि. १४ ते १९ पर्यंत काळ्या फिती लाऊन तसेच दि. २० जानेवारी पासून बेमुदत संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. सातवा वेतन आयोग लागु करणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुधारीत अश्वासीत प्रगती योजना पुर्ववत लागु करणे, सातव्या आयोगाच्या शिफारसी नुसार तीन लाभाची १०, २०, ३० अश्वासित प्रगती योजना लागु करणे. २००५ नंतरच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागु करणे अशा मागण्या नमुद करण्यात आलेले आहे. याप्रसंगी महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी पवार व्ही.के.(अधिक्षक), काळे बी.आर, पल्हाळ एस.एन, शेलार आर.जी, भोसले आर.एन, काळे ए.के, लोखंडे जे.जी, चव्हाण वाय.आर, पवार ए.एच., बोरसे व्ही.जे, थापा जी.एम., जंजाळ एन.बी., अकोलकर ए.टी., सर्वश्री करवंदे, सोनवणे, जाधव, चव्हाण, जाधव ए.आर आदींसह सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Kannad Shivaji College Library

दैनिक दिव्य मराठी

दिव्य मराठी, शनिवार, १८ डिसेंबर २०२१

# निवृत्तीनंतरही जपली विद्यार्थ्यांशी बांधिलकी, संस्थेप्रती कृतार्थ भाव

प्रतिनिधी | कन्नड



येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील य निवृत्त होणारे कर्मचारी डॉ.विद्या कस्तुरे व शेखर पाटे यांनी संस्थेच्या विकासात योगदान म्हणून स्व कमाईतून संस्थेसाठी आर्थिक योगदान दिले व संस्थेप्रती कृतार्थ भावना व्यक्त केली. निवृत्तीनंतरही सामाजिक बंधीलकीसह विद्यार्थ्यांशी असलेली बांधिलकी जपून संस्थेप्रती कृतार्थ भावनेतून प्रा.विद्या कस्तुरे यांनी संस्थेस एक लक्ष रुपयाचे आर्थिक योगदान दिले.प्रा.डॉ. विद्या कस्तुरे या मानसशास्त्र, विभागाच्या प्राध्यापिका आहेत. त्यांनी हा निधी त्यांचे वडिल प्रो.दामोदर कस्तुरे यांच्या स्मरणार्थ संस्थेस दिला आहे. संस्थेच्या प्रति कृतार्थ भावना व्यक्त करण्यासाठी त्यांनी हा निधी दिला आहे. त्यासोबतच संस्थेचे निवृत्त वरिष्ठ लिपीक शेखर पाटे यांनी संस्थेस एकावन्न हजार रु. आर्थिक योगदान दिले. त्यांनी त्यांचे वडिल प्रभाकरराव पाटे यांच्या स्मरणार्थ संस्थेस ही देणगी दिली. दोन्ही सहकाऱ्यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मदत करण्यासाठी संस्थेस निधी दिला आहे. त्यांच्या या योगदानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार, उपाध्यक्ष अशोकराव आहेर, डॉ.पंढरीनाथ केशवराव निकम, चंद्रकांत देशमुख, डॉ.डी.डी. शिंदे, डॉ. आनंदराव महाले, कृष्णाराव पाटील, बाबासाहेब मोहिते, अनवर खान नुर महंमद खान, लक्ष्मणराव देशमुख, मनोज पवार, डॉ.रुपेश मोरे, प्राचार्य डॉ.व्ही.एन.भोसले, उपप्राचार्य डॉ.बी.के. मगर, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

Shivaji College Library
Kannad

पुण्य नगरी
शनिवार, १८ डिसेंबर २०२१

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा काळ्या फिती लावून निषेध

**कन्नड शहर :** आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून काम केले. महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी महासंघाच्या माध्यमातून शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शासनाचा निषेध केला. यावेळी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्राचार्यांना निवेदन दिले. याप्रसंगी महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी व्ही. के पवार, बी. आर. काळे, एस.एन. पल्हाळ, शेलार, आर.जी. भोसले, आर.एन. काळे, ए. के.लोखंडे, जे.जी. चव्हाण, वाय. आर.पवार, ए. एच. बोरसे, व्ही.जे. थापा, जी. एम. जंजाळ, एन.बी. निकम, एस. आर.अकोलकर आदींसह सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

शुक्रवार, दि. १७ डिसेंबर २०२१ आदर्श गावकरी

## कन्नडमध्ये शिक्षकांचा काळ्या फिती लावून निषेध



**कन्नड :** येथील शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी काळ्या फिती लावून शासनाचा निषेध केला. त्यानंतर प्राचार्यांना निवेदन देण्यात आले. शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करावा, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुधारीत अश्वासीत प्रगती योजना पूर्ववत लागू करावी, तीन लाभाची अश्वासीत प्रगती योजना लागू करावी, २००५ नंतरच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करावी आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या. तसेच दिनांक २० डिसेंबर पासून बेमुदत संपात सहभागी होण्याचा निर्णय या शिक्षकांनी घेतला आहे. यावेळी शिक्षकेत्तर कर्मचारी पवार, काळे, पल्हाळ, शेलार, भोसले, काळे, लोखंडे, चव्हाण, पवार, बोरसे, थापा, जंजाळ, निकम, अकोलकर, करवंदे, सोनवणे, जाधव, चव्हाण, ढेंगळे, भागवत, गायकवाड, ढाकणे, मोरे, कोलते, जाधव आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Kannad * Shivaji College Library *

,१९ डिसेंबर २०२१ सकाळ



कन्नड : शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन देऊ केले. यावेळी मानसिंग पवार, पी. के. निकम, अशोक आहेर, चंद्रकांत देशमुख, बाबासाहेब मोहिते, विजय भोसले आदी.

# संस्थेसाठी कर्मचारी सरसावले

**कन्नड ता.१८ (बातमीदार)** श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या विकास कामांसाठी कर्मचारी सरसावले आहेत. संस्थेचे अध्यक्ष मानसिंग पवार यांच्याकडे (ता.१७) कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन सुपूर्द केले.

याबाबत बाबूलाल काळे यांनी सांगितले की, संस्थेच्या विकासासाठी आम्ही एक दिवसाचे वेतन दिले आहे. यावेळी राजू शेलार, विलास पवार, केशव डेंगळे, ईश्वर ढाकणे, नंदू पवार, जगदीश लोखंडे, बालाजी आल्हाड, योगेश चव्हाण, अरुण गायकवाड, नाना जंजाळ, राजू जाधव, संजय निकम, दिलीप कोलते, रवी भागवत, प्रकाश जाधव, वसंत बोरसे आदींनी संस्थेचे अध्यक्ष मानसिंग पवार, उपाध्यक्ष अशोक आहेर, सचिव डॉ. पी. के. निकम, कोषाध्यक्ष चंद्रकांत देशमुख, संचालक डॉ. डी. डी. शिंदे, डॉ.आनंद महाले, कृष्णराव पाटील, बाबासाहेब मोहिते, अन्वर खान, लक्ष्मणराव देशमुख, मनोज पवार, रपेश मोरे, प्राचार्य विजय भोसले, उपप्राचार्य बी. के. मगर यांनी ही मदत स्वीकारली. सेवानिवृत्त कर्मचारी चंद्रशेखर पाटे यांनी एक्कावन्न हजार, प्रा.विद्या कस्तूरे यांनी एक लाख रुपये प्रदान केले. सेवानिवृत्त प्रा.बाबूराव केंद्रे यांचे अकस्मात निधन झाले. याबद्दल त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्राचार्य विजय भोसले यांनी प्रा. केंद्रे यांच्या शैक्षणिक, सामाजिक वाटचालीचा आढावा घेऊन श्रद्धांजली वाहिली.

Kannad * Library * Shivaji College

पुण्य नगरी

सोमवार, २० डिसेंबर २०२१

# निवृत्तीनंतरही जपली विद्यार्थ्यांशी बांधीलकी

## ■ डॉ. कस्तुरे व पाटे यांचे संस्थेस आर्थिक योगदान



**कन्नड / शहर प्रतिनिधी**

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील निवृत्त होणारे कर्मचारी डॉ.व्ही.डी. कस्तुरे व शेखर पाटे यांनी संस्थेसाठी आर्थिक योगदान दिले. निवृत्तीनंतरही सामाजिक बंधिलकीसह विद्यार्थ्यांशी असलेली बांधिलकी जपून संस्थेप्रती कृतार्थ भावनेतून प्रा. डॉ. व्ही.डी. कस्तुरे यांनी संस्थेस एक लाखांचे आर्थिक योगदान दिले.

प्रा. कस्तुरे या मानसशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका आहेत. त्यांनी हा निधी त्यांचे वडिल प्रो. दामोदर कस्तुरे यांच्या स्मरणार्थ संस्थेस दिला आहे. त्यासोबतच संस्थेचे निवृत्त वरिष्ठ लिपीक शेखर पाटे यांनी वडिल प्रभाकर पाटे यांच्या स्मरणार्थ संस्थेत ५१ हजारांचे आर्थिक योगदान दिले.

या योगदानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार, उपाध्यक्ष अशोकराव आहेर, डॉ. पंढरीनाथ निकम,चंद्रकांत देशमुख, डॉ.डी.डी. शिंदे, डॉ. आनंदराव महाले, कृष्णाराव पाटील, बाबासाहेब मोहिते, अनवर खान नुर महंमद खान, लक्ष्मणराव देशमुख, मनोज पवार, डॉ. रुपेश मोरे, प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

तरुण भारत

शुक्रवार, दि. २४ डिसेंबर २०२१

# शिवाजी महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना

**कन्नड, दि.२३ डिसेंबर -**

विद्यार्थ्यांच्या सुप्त कला , गुणांना वाव मिळून त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे. नव विद्यार्थी प्रतिभावंताचा शोध घेऊन त्यांना लिहितं करण्यासाठी मार्गदर्शन व्हावं यासाठी कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात २०२१ - २२ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची बैठक घेऊन (ता.२२) रोजी भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. कार्यकारिणी अशी - अध्यक्ष मोनाली जाधव, उपाध्यक्ष रोहन पवार, साक्षी नलावडे, सचिव - दिक्षा सोनवणे, सहसचिव - प्रफुल्ल जाधव, प्रसिद्धी प्रमुख अंजली भरडे तर सदस्यपदी - वैभव नागरे, सागर घुगे, साईनाथ सोनवणे, वेदंती घाडगे, नीता जंजाळ यांची निवड करण्यात आली. लवकरच वाङ्मय मंडळाचा उद्घाटन समारंभ घेण्यात येणार आहे. सर्व पदाधिका-यांचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी डॉ. शिवाजी हुसे, डॉ. अलका गडकरी, डॉ. रामचंद्र झाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्ग दर्शन केले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येंनी उपस्थित होते.

Shivaji College Library * Kannad *

24/12/2021

महाराष्ट्र टाइम्स




भाषा वाङ्मय मंडळातील विद्यार्थी.

# शिवाजी कॉलेजात वाङ्मय मंडळ सुरू

**कन्नड :** विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळून त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, प्रतिभावंत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना लिहिते करण्यासाठी मार्गदर्शन द्यावे, यासाठी कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांची बैठक झाली.

या बैठकीत भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष म्हणून मोनाली जाधव, उपाध्यक्षपदी रोहन पवार, साक्षी नलावडे यांची निवड झाली. उर्वरित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे सचिव - दीक्षा सोनवणे, सहसचिव - प्रफुल्ल जाधव, प्रसिद्धीप्रमुख अंजली भरडे; तर सदस्यपदी - वैभव नागरे, सागर घुगे, साईनाथ सोनवणे, वेदंती घाडगे, नीता जंजाळ यांची निवड करण्यात आली. या वेळी डॉ. शिवाजी हुसे, डॉ. अलका गडकरी, डॉ. रामचंद्र झाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले. या वेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक दखनी स्वराज्य २४/१२/२०२१ संपादक : संतोष श्रीमंतराव तांबे
९८५००१७१७५

Shivaji College Library Kannad

# शिवाजी महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळस्थापन



दै.दखनी स्वराज्य / वृत्तसंस्था

कन्नड - विद्यार्थ्यांच्या सुप्त कला, गुणांना वाव मिळून त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे. नव विद्यार्थी प्रतिभावंताचा शोध घेऊन त्यांना लिहितं करण्यासाठी मार्गदर्शन व्हावं यासाठी कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात २०२१ - २२ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची बैठक घेऊन (ता. २२ ) रोजी भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. कार्यकारिणी अशी - मोनाली जाधव , उपाध्यक्ष रोहन पवार, साक्षी नलावडे, सचिव - दिक्षा सोनवणे, सहसचिव - प्रफुल्ल जाधव, प्रसिद्धी प्रमुख अंजली भरडे तर सदस्यपदी - वैभव नागरे, सागर घुगे, साईनाथ सोनवणे, वेदंती घाडगे, नीता जंजाळ यांची निवड करण्यात आली. लवकरच वाङ्मय मंडळाचा उद्घाटन समारंभ घेण्यात येणार आहे. सर्व पदाधिका-यांचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी डॉ. शिवाजी हुसे, डॉ. अलका गडकरी, डॉ. रामचंद्र झाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्ग दर्शन केले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले.

Shivaji College Library * Kannad *

दिव्य मराठी, शुक्रवार, २४ डिसेंबर २०२१

# आरोग्य विभागाच्या स्पर्धेत कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयाचे यश

कन्नड । महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी व जिल्हा एड्स प्रतिबंध पथक जिल्हा रुग्णालय औरंगाबादतर्फे न्यू इंडिया अॅट ७५ उपक्रमात रक्तदान या विषयावर पोस्टर स्पर्धा आणि एचआयव्ही एड्स, टीबी जनजागृती संदर्भात शॉर्ट व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत सहभागी झालेल्या शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. या स्पर्धेतील निकाल असे : स्मृती दमई (प्रथम) पारितोषिक प्राप्त, अंजली दमई (द्वितीय), सुमीत देशमुख (तृतीय) आणि व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत अंजली दमई (प्रथम), अमृता दमई (द्वितीय), निदा शेख (तृतीय).

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार, अशोक आहेर, डॉ. पी. के. निकम, डॉ. ए. के. महाले यांनी अभिनंदन केले.

Kannad * Shivaji College * Library

दैनिक दिव्य मराठी
दिव्य मराठी. औरंगाबाद, शनिवार, २५ डिसेंबर २०२१

## शिवाजी महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना



**कन्नड** । विद्यार्थ्यांच्या सुप्त कला , गुणांना वाव मिळून त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे. नव विद्यार्थी प्रतिभावंताचा शोध घेऊन त्यांना लिहितं करण्यासाठी मार्गदर्शन व्हावे यासाठी कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची बैठक घेऊन (ता.२२) रोजी भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. कार्यकारिणी अशी - मोनाली जाधव, उपाध्यक्ष रोहन पवार, साक्षी नलावडे, सचिव- दिक्षा सोनवणे, सहसचिव- प्रफुल्ल जाधव, प्रसिद्धी प्रमुख अंजली भरडे तर सदस्यपदी- वैभव नागरे, सागर घुगे, साईनाथ सोनवणे, वेदंती घाडगे, नीता जंजाळ यांची निवड करण्यात आली. लवकरच वाङ्मय मंडळाचा उद्घाटन समारंभ घेण्यात येणार आहे. सर्व पदाधिकाऱ्यांचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी डॉ. शिवाजी हुसे, डॉ. अलका गडकरी, डॉ. रामचंद्र झाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले

लोकमत
औरंगाबाद, शनिवार, दि. २५ डिसेंबर २०२१

## शिवाजी महाविद्यालयात मंडळाची स्थापना

**कन्नड :** विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाढ मिळून त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे. नवविद्यार्थी प्रतिभावंताचा शोध घेऊन त्यांना लिहिते करण्यासाठी कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची बैठक घेऊन बुधवारी भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. या कार्यकारिणीत अध्यक्ष मोनाली जाधव, उपाध्यक्ष रोहन पवार, साक्षी नलावडे, सचिव दीक्षा सोनवणे, सहसचिव प्रफुल्ल जाधव, प्रसिद्धी प्रमुख अंजली भरडे तर सदस्यपदी वैभव नागरे, सागर घुगे, साईनाथ सोनवणे, वेदंती घाडगे, नीता जंजाळ यांचा समावेश आहे. लवकरच वाङ्मय मंडळाचा उद्घाटन समारंभ होणार आहे. या निवडीवेळी प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. अलका गडकरी, डॉ. रामचंद्र झाडे उपस्थित होते.

Shivaji College Library * Kannad *

आदर्श गावकरी

www.adarshgavkari.com

शनिवार, दि. २५ डिसेंबर २०२१

७

## शिवाजी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी दिला एका दिवसाचा पगार संस्थेच्या विविध उपक्रमास



**कन्नड :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी एका दिवसाचा प्रकार महाविद्यालयात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमासाठी स्वयंमफुर्तीने दिला आहे. एक दिवसाचा पगार संस्थेस योगदान देण्याची भावना कर्मचाऱ्यांनी प्राचार्य व अध्यक्ष यांच्याजवळ व्यक्त करत सदर रकमेचा धनादेश अध्यक्ष मानसिंह पवार यांच्याकडे सूपर्द केला. यावेळी संस्थाध्यक्ष मानसिंह पवार, उपाध्यक्ष अशोक आहेर, सेक्रेटरी डॉ. पंढरीनाथ निकम, कोषाध्यक्ष चंद्रकांत देशमुख, डॉ.डि.डि. शिंदे, डॉ. आनंदराव महाले, कृष्णा पाटील, बाबासाहेब मोहिते, अनवर खान, लक्ष्मण देशमुख, मनोज पवार, रुपेश मोरे, प्राचार्य डॉ.व्ही.एन.भोसले, उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर आदी हजर होते.

Shivaji College Library ✻ Kannad ✻

आदर्श गावकरी
शनिवार, दि. २५ डिसेंबर २०२१

# शिवाजी महाविद्यालयात स्पर्धा



**कन्नड :** जागतिक एड्स दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय कन्नड व रेड रिब्बेन क्लब शिवाजी महाविद्यालय कन्नड यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक एड्स दिनानिमित्त विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

त्यात स्वेच्छा रक्तदानासाठी पोस्टर स्पर्धा, एचआयव्ही आणि क्षयरोग जनजागृती व्हिडीओ शॉर्टफिल्म स्पर्धा घेण्यात आल्या. यात स्वेच्छा रक्तदान पोस्टर स्पर्धेमध्ये प्रथम श्रुती भरत दमाई, द्वितीय क्रमांक अंजली गंगाराम दमाई, तृतीय सुमित उदयसिंह देशमुख तर जनजागृती व्हिडीओ शॉर्टफिल्म स्पर्धेत प्रथम क्रमांक सामूहिक रित्या अंजली गंगाराम दमाई, संजना भरत दमाई, श्रुती भरत दमाई, राधा गंगाराम दमाई, द्वितीय अमृता गंगाराम दमाई, पलक भरत दमाई, तृतीय निदा शेख हुसेन या विद्यार्थ्यांना पारितोषिक रोख रक्कम ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार, तृतीय २ हजार व प्रमाणपत्र देण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. विजय भोसले होते. सूत्रसंचालन प्रा.संगाई यांनी केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. डॉ.मगर, प्रमुख पाहुणे कन्नड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. डी. एन. देगावकर, संजय पवार, विनोद मस्के, विजय सोनवणे, अनिरुद्ध काळे, डॉ. जितेंद्र शिंदे, वसीम शेख, युसुफ शेख, प्रा. डॉ. अहिराव, प्रा. डॉ तान्हाजी जाधव आदी हजर होते.

महाराष्ट्र टाइम्स 25/12/2021

# शिवाजी कॉलेजचे स्पर्धेत यश

Shivaji College Library Kannad

कन्नड : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी व औरंगाबाद जिल्हा एड्स प्रतिबंध पथक व जिल्हा रुग्णालयातर्फे औरंगाबाद ७५ मधील नवीन भारत या उपक्रमात रक्तदान या विषयावर पोस्टर स्पर्धा आणि एचआयव्ही, एड्स व क्षयरोग या आजारा विषयी जनजागृती संदर्भात शॉर्ट विडियो निर्मीती स्पर्धेत सहभागी झालेल्या शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

या स्पर्धेमध्ये स्मृती दमई (प्रथम), अंजली दमई (द्वितीय), सुमीत देशमुख (तृतीय) आणि व्हिडीओ निर्मिती स्पर्धेत अंजली दमई (प्रथम), अमृता दमई (द्वितीय), निदा शेख (तृतीय) या प्रमाणे प्राविण्य मिळवले आहे. या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण आणि एड्स जनजागृती निमित्त रक्त तपासणी शिबिराचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार, उपाध्यक्ष अशोक आहेर, सचिव डॉ. पी. के. निकम, डॉ. ए. के. महाले, प्राचार्य विजय भोसले, कन्नड ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. दत्ता देगावकर, जिल्हा एड्स नियंत्रण पथक प्रकल्प समन्वयक आदींनी अभिनंदन केले आहे.

Shivaji College Library
Kannad

लोकमत
औरंगाबाद, सोमवार
दि. २७ डिसेंबर २०२१
epaper.lokmat.com



# शिवाजी महाविद्यालयाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कन्नड :** ज्य एड्स नियंत्रण सोसायटी व जिल्हा एड्स प्रतिबंध पथक यांच्यातर्फे, 'न्यू इंडिया अॅट ७५' या विषयावर पोस्टर स्पर्धा आणि एचआयव्ही, टीबी आजारावरील जनजागृतीबाबतच्या शॉर्ट फिल्म निर्मिती स्पर्धेत शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

या स्पर्धेत स्मृती दमई (प्रथम), अंजली दमई (द्वितीय), सुमीत देशमुख (तृतीय) यांनी विजय मिळविला. तर व्हिडीओ निर्मिती स्पर्धेत अंजली दमई, अमृता दमई, निदा शेख यांनी अनुक्रमे यश संपादन केले आहे.

याप्रसंगी आयोजित तपासणी शिबिरात ६७ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी झाली. यावेळी प्रकल्प संचालक संजय पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्ता देगावकर, अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही.एन. भोसले यांची उपस्थिती होती.

Kannad
Shivaji College Library

दैनिक भास्कर
औरंगाबाद, मंगलवार, 28 दिसंबर 2021

# चयन जांच में शामिल हुए 16 महाविद्यालयों के खिलाड़ी



## अंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल टूर्नामेंट

**औरंगाबाद** | शिवाजी कला महाविद्यालय और डॉ. बाबासाहब आंबेडकर मराठवाड़ा विश्वविद्यालय की ओर से 27 दिसंबर को अंतरमहाविद्यालयीन सॉफ्टबॉल चयन जांच का आयोजन शिवाजी महाविद्यालय में किया गया। चयन जांच के लिए 16 महाविद्यालयों के खिलाड़ियों ने हिस्सा लिया।

चयन जांच का उद्घाटन नवोदय विद्यालय के प्राचार्य डॉ. देशमुख ने किया। इस अवसर पर प्राचार्य विजय भोसले, क्रीड़ा मंडल सदस्य डॉ. संदीप जगताप, डॉ. पीआर रोकड़े, उप प्राचार्य भाऊसाहब मगर, डॉ. सुहास यादव, डॉ. सचिन पगारे, किरण शूर कांबले आदि उपस्थित थे। कार्यक्रम का संचालन डॉ. उदय डोंगरे ने किया। चयन जांच में अंपायर की भूमिका गणेश बेटूदे, प्रदीप बोरसे, राकेश खैरनार, संतोष आवचार, प्रवीण शिंदे, अक्षय बिरादार, सागर रूपवते, स्वरूप घुले, इशांत रॉय अन्य ने निभाई।

Kannad * Shivaji College Library *

सामना शनिवार, १ जानेवारी २०२२



## शिवाजी महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना

**कन्नड :** येथील शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांची बैठक घेऊन तीत भाषा वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. कार्यकारिणी अशी : अध्यक्ष- मोनाली जाधव, उपाध्यक्ष- रोहन पवार, साक्षी नलावडे, सचिव - दीक्षा सोनवणे, सहसचिव - प्रपुल्ल जाधव, प्रसिद्धीप्रमुख- अंजली भरडे. तर सदस्यपदी - वैभव नागरे, सागर घुगे, साईनाथ सोनवणे, वेदंती घाडगे, नीता जंजाळ यांची निवड करण्यात आली. पदाधिकाऱ्यांचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी अभिनंदन केले. या वेळी डॉ. शिवाजी हुसे, डॉ. अलका गडकरी, डॉ. रामचंद्र झाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्ग दर्शन केले.

Shivaji College Library * Kannad *

04/01/2022

महाराष्ट्र टाइम्स

# शिवाजी कॉलेजात अभिवादन

**कन्नड :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागात अभिवादन करण्यात आले. या वेळी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रतिभा अहिरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती दिली. प्रास्ताविक प्रा. सिताराम मोगल यांनी केले. या वेळी प्रा. स्वाती भोसले, मच्छिंद्र गायकवाड, प्रा. सुनील गोरडे, प्रा. सीमा काशिद, संजय निकम आदींची उपस्थिती होती.



शिवाजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

सकाळ
औरंगाबाद, गुरुवार,
६ जानेवारी २०२२

Shivaji College Library Kannad

# कवीने अन्यायाविरुद्ध लिहिले पाहिजे

## ललित अधाने यांचे आवाहन : शिवाजी महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन

**कन्नड, ता. ५ (बातमीदार)** : आजी आजोबांच्या गोष्टी ऐकूनच आम्ही मोठे झालो व संस्कारित झालो. कवी म्हणून पुढे आलो. कवी, लेखकांनी भोवतालच्या वास्तवाकडे डोळसपणे पाहिले पाहिजे. खऱ्या कवितेचा जन्म वेदनेतून होतो. कवी वंचितांच्या बाजूने लढत असतो. तो नेहमी सत्याच्या बाजूने उभा राहतो. त्यामुळे नेहमीच अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लिहिले पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी ललित अधाने यांनी (ता.५) शिवाजी महाविद्यालयात केले.

शिवाजी महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळाचे उद्घाटन प्रा.अधाने यांच्या हस्ते झाले. यावेळी तें बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर होते. यावेळी डॉ. अधाने यांनी'' बरं झालं तू आला, चवळी, महापूर, शेतकरी आंदोलन आदी बहारदार कविता सादर करून विद्यार्थ्यांची वाहवा मिळवली. शेती, शेतकऱ्यांचे, वंचितांचे प्रश्न यावर परखडपणे भाष्य केले. मंचावर प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, हिंदी विभाग प्रमुख डॉ. जी. के. बुरसे, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. विजय मातकर, प्रा.अशोक भोसीकर, डॉ.अलका गडकरी, डॉ. रामचंद्र झाडे, भाषा वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष मोनाली जाधव, उपाध्यक्ष रोहन पवार, साक्षी नलावडे यांची उपस्थिती होती.

यावेळी मराठी, इंग्रजी, हिंदी विषयाच्या भित्ती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच वाङ्मय मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केला. कार्यक्रमास डॉ. बी. जी. देशमुख, डॉ.आर. के. पवार यांची उपस्थिती होती. यशस्वितेसाठी मंडळाचे दिक्षा सोनवणे, प्रफुल्ल जाधव, अंजली बरडे, वैभव नागरे, सागर घुगे, साईनाथ सोनवणे, वेदांती घाडगे, नीता जंजाळ आदींनी प्रयत्न केले. डॉ. अलका गडकरी यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.



**कन्नड : शिवाजी महाविद्यालयात भाषा व वाङ्मय मंडळाचे उद्घाटन कवी प्रा.ललित अधाने यांच्या हस्ते झाले. यावेळी अशोकराव आहेर, विजय भोसले, शिवाजी हुसे, बी. के. मगर आदी.**

Shivaji College Library Kannad

07/01/2022

देशोन्नती एक्स्लूझि

# कविने अन्यायाच्या विरोधात लिहिले पाहिजे - डॉ.ललित अधाने

## कन्नड येथे भाषा वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन



कन्नड ■ तुमच्याशी काव्यरूपी संवाद साधण्यासाठी मी आलो आहे. आजी आजोबांच्या गोष्टी ऐकूनच आम्ही मोठे झालो व संस्कारीत झालो. कवी म्हणून पुढे आलो. कवी, लेखकांनी भोवतालच्या वास्तवाकडे डोळसपणे पाहिले पाहिजे. खऱ्या कवितेचा जन्म वेदनेतून होतो. कवी वंचितांच्या बाजूने लढत असतो. तो नेहमी सत्याच्या बाजूने ऊभा राहतो. कविने नेहमीच अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लिहिले पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी ललित अधाने यांनी केले. येथील शिवाजी महाविद्यालयात बुधवारी (ता.५) भाषा वाङ्मय मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी उद्‌घाटक म्हणून ते उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर होते.

यावेळी डॉ.अधाने यांनी बरं झालं तू आला, चवळी, महापूर, शेतकरी आंदोलन आदी बहारदार कविता सादर करून विद्यार्थ्यांची वाहवा मिळवली. शेती, शेतकऱ्यांचे, वंचितांचे प्रश्न यावर परखडपणे भाष्य केले. मंचावर प्राचार्य डॉ.विजय भोसले, उपप्राचार्य डॉ.बी.के.मगर, मराठी विभाग प्रमुख डॉ.शिवाजी हुसे, हिंदी विभाग प्रमुख डॉ.जी.के.बुरसे, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.विजय मातकर, प्रा.अशोक भोसीकर, डॉ.अलका गडकरी, डॉ.रामचंद्र झाडे, भाषा वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष मोनाली जाधव, उपाध्यक्ष रोहन पवार, साक्षी नलावडे यांची उपस्थिती होती. प्रास्तविक डॉ.शिवाजी हुसे यांनी केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ.विजय भोसले म्हणाले, की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यांच्या मनात न्यूनगंड असतो तो बाजूला ठेऊन विद्यार्थ्यांनी पुढे आले पाहिजे. त्यासाठी महाविद्यालय मोठे व्यासपीठ असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमास डॉ.बी.जी.देशमुख, डॉ.आर.के.पवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वाङ्मय मंडळाचे दिक्षा सोनवणे, प्रफुल्ल जाधव, अंजली बरडे, वैभव नागरे, सागर घुगे आदींनी प्रयत्न केले. डॉ.अलका गडकरी यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. (ता.प्र.)

ePaper देशोन्नती
Fri, 07 January 2022
https://deshonnati.digitaledition.in/c/65453734

Shivaji College Kannad Library

लोकमत
औरंगाबाद, शुक्रवार, दि. ७ जानेवारी २०२२

# विद्यार्थ्यांसाठी मार्केटिंगचे ज्ञान महत्त्वाचे -जिल्हाधिकारी

लोकमत न्यूज नेटवर्क

कन्नड : माणूस जसे स्वतःच्या आरोग्याच्या काळजीसाठी शरीराची तपासणी करतो, अगदी त्याचप्रमाणे जमिनीचे मातीपरीक्षण करणे गरजेचे आहे. तालुक्यातील शेती ऊर्जितावस्थेत असून शेतीतील प्रयोगांना सर्वतोपरी मदत केली जाईल. शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे दर्जेदार पॅकेजिंग करून विद्यार्थ्यांनी ग्राहकांसाठी थेट विक्री केंद्रे सुरू करावीत. ऑनलाईन मार्केटिंगचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी केले.

कन्नडच्या शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्थापन झालेल्या मातीपरीक्षण प्रयोगशाळेचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष मानसिंग पवार म्हणाले, सामाजिक बांधिलकीतून उभारलेल्या या प्रयोगशाळेत फी आकारली जाणार नाही. कृषिमंचाच्या माध्यमातून शेती व शेतकरीउपयोगी उपक्रम राबविले जातील.

कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, आमदार उदयसिंग राजपूत, तहसीलदार संजय वारकड, तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, कृषिभूषण संतोष जाधव, अजय जाधव, पोपटराव दापके, संस्थेचे पदाधिकारी, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर यांची उपस्थिती होती. प्रा. विजय भोसले यांनी प्रास्ताविक, तर अनिल क्षीरसागर यांनी आभार मानले.

07/01/2022

अग्रलेख
मुखवट्यांचेही राजकारण
आजचा गणपती
www.maharashtratimes.com
महाराष्ट्र टाइम्स
मटा @60
गुरुवारचे तापमान
औरंगाबाद
कमाल 26.6
किमान 14.3

# माती परीक्षण प्रयोगशाळेचे लोकार्पण

म. टा. प्रतिनिधी, कन्नड

कन्नड शहरातील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली. या प्रयोगशाळेचे लोकार्पण जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्या हस्ते व आ. उदय सिंग राजपूत, उद्योगपती व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या श्रमाला वैज्ञानिकतेची जोड देऊन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शिवाजी महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांना मातीच्या प्रकाराची वैज्ञानिक माहिती मिळून मातीचा पोत पाहून शेतकऱ्यांना योग्य पिकांची व खताच्या मात्रांची निवड करता येणार आहे. सदर प्रयोगशाळा कृषी मंचाअंतर्गत स्थापना करण्यात आली. या महाविद्यालयातील कृषी मंचाकडून आतापर्यंत शेतकऱ्यांसाठी दर्जेदार कार्यक्रम घेण्यात आले आहेत. या प्रयोगशाळेकडून मंचाच्या सदस्यांना



महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते, तहसीलदार संजय वारकड, मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे, कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, नवोदय विद्यालयाचे प्राचार्य पंकज देशमुख, जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर, बाबासाहेब मोहिते, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विजय भोसले यांनी केले, तर सूत्रसंचालन डी. डब्ल्यू.

" आधुनिक शेतीबरोबरच शेतकऱ्यांच्या मुलांनी मार्केटिंग मध्ये येणे गरजेचे आहे. नवीन पिढीने आपल्या भागात निर्माण झालेल्या महामार्गांचा योग्य वापर करून शेतकऱ्यांची उत्पादने सरळ ग्राहकांना विकण्याची केंद्रे सुरू करावीत. शेतकऱ्यांची उत्पादने चांगली पॅकेजिंग करून विकावीत व हे तंत्रे विद्यार्थ्यांना शिकवावीत.

- सुनील चव्हाण,
जिल्हाधिकारी, औरंगाबाद

सामाजिक बांधिलकीतून उभारलेल्या या मातीच्या प्रयोगशाळेतून होणाऱ्या परीक्षणासाठी कुठलीही फी आकारली जाणार नाही. प्रयोगशाळेत आधुनिक सेवा सुविधा उपलब्ध करून कृषी मंचांतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केल्या जातील.

- मानसिंह पवार,

Shivaji College Library * Kannad *

63

Kannad * Shivaji College Library *

दैनिक दिव्य मराठी

दिव्य मराठी. शुक्रवार, ७ जानेवारी २०२२

# कवी, लेखकांनी वास्तवाकडे डोळसपणे पाहिले पाहिजे

## कवी ललित अधाने यांचे कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयात प्रतिपादन

प्रतिनिधी । कन्नड

तुमच्याशी काव्यरूपी संवाद साधण्यासाठी मी आलो आहे. आजी-आजोबांच्या गोष्टी ऐकूणच आम्ही मोठे झालो व संस्कारीत झालो. कवी म्हणून पुढे आलो. कवी, लेखकांनी भोवतालच्या वास्तवाकडे डोळसपणे पाहिले पाहिजे. खऱ्या कवितेचा जन्म वेदनेतून होतो. कवी वंचितांच्या बाजूने लढत असतो. तो नेहमी सत्याच्या बाजूने उभा राहतो. कविने नेहमीच अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लिहिले पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी ललित अधाने यांनी केले. येथील शिवाजी महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून ते उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अशोक आहेर होते. डॉ. अधाने यांनी बरं झालं तू आला, चवळी, महापूर, शेतकरी आंदोलन आदी बहारदार कविता सादर करून विद्यार्थ्यांची वाहवा मिळवली. शेती, शेतकऱ्यांचे, वंचितांचे प्रश्न यावर परखडपणे भाष्य केले. मंचावर प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य बी. के. मगर, प्रा. शिवाजी हुसे, प्रा. जी. के. बुरसे, प्रा. विजय मातकर, प्रा. अशोक भोसीकर, डॉ. अलका गडकरी, डॉ. रामचंद्र झाडे, भाषा वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष मोनाली जाधव, उपाध्यक्ष रोहन पवार, साक्षी नलावडे यांची उपस्थिती होती. मराठी, इंग्रजी, हिंदी विषयाच्या भित्तिपत्रकांचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यांच्या मनात न्यूनगंड असतो तो बाजूला ठेवून विद्यार्थ्यांनी पुढे आले पाहिजे. त्यासाठी महाविद्यालय मोठे व्यासपीठ असल्याचे मत व्यक्त केले. प्रा. बी.जी. देशमुख, प्रा. आर. के. पवार यांची उपस्थिती होती. यशस्वितेसाठी वाङ्मय मंडळाचे दीक्षा सोनवणे, प्रफुल्ल जाधव, अंजली बरडे, वैभव नागरे, सागर घुगे, साईनाथ सोनवणे, वेदांती घाडगे, नीता जंजाळ आदींनी प्रयत्न केले. डॉ. अलका गडकरी यांनी आभार मानले.

सकाळ
औरंगाबाद, शनिवार,
८ जानेवारी २०२२

Kannad
Shivaji College Library



कन्नड : शहरातील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेच्या लोकार्पण प्रसंगी सुनील चव्हाण, उदयसिंग राजपूत, मानसिंह पवार आदी.

# माती परीक्षण प्रयोगशाळेचे कन्नडमध्ये झाले लोकार्पण

**कन्नड, ता. ७ (बातमीदार) :** शहरातील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचे लोकार्पण जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्या हस्ते व आमदार उदयसिंग राजपूत, उद्योगपती व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच झाले.

शेतकऱ्यांच्या श्रमाला वैज्ञानिकतेची जोड देऊन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शिवाजी महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्रयोगशाळा कृषी मंच अंतर्गत स्थापना करण्यात आली. दरम्यान, महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसीलदार संजय वारकड, मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे, कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, नवोदय विद्यालयाचे प्राचार्य पंकज देशमुख, कृषिभूषण पोपटराव दापके, संतोष जाधव, कृषिभूषण अजय जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर, बाबासाहेब मोहिते, उपप्राचार्य डॉ.बी. के. मगर आदी उपस्थित होते. प्रा. विजय भोसले यांनी प्रास्ताविक केले. डी. डब्ल्यू. शिंदे यांनी सूत्रसंचालन तर अनिल क्षिरसागर यांनी आभार मानले.

**"सामाजिक बांधिलकीतून उभारलेल्या या मातीच्या प्रयोगशाळेतून होणाऱ्या परीक्षणासाठी कुठलीही फीस आकारली जाणार नाही. या प्रयोगशाळेत आधुनिक सेवा सुविधा उपलब्ध करून कृषी मंच अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले जातील.**

**– मानसिंह पवार,** उद्योगपती, संस्थेचे अध्यक्ष

08/01/2022

प्रतिनिधी:-सागर पाटील कन्नड

दैनिक

# मराठवाडा साथी

www.marathwadasathi.in

# माती परीक्षण प्रयोग शाळेचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

## जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण यांच्या हस्ते झाले उद्घाटन

**कन्नड।** कन्नड येथील शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली. या प्रयोगशाळेचे उद्घाटन (दि.६) जानेवारी रोजी औरंगाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

कन्नड तालुका भौगोलिक दृष्ट्या मराठवाड्यातील एक अत्यंत समृध्द तालुका आहे. उंच डोंगर, सखल व सपाट व सुपिक जमीन, शिवना, अंजना, गांधारी सारख्या नद्या, अंबाडी, टाकळी, नागद, पिशोर येथील धरणे यामुळे निर्माण झालेली शेतीची समृध्द परंपरा कन्नड तालुक्यात आहे. कन्नड तालुक्यातील शेतकरी अत्यंत मेहनती व प्रयोगशील आहे. केळी व उसाच्या पारंपारिक पिकाबरोबरच अद्रक, हळद, मोसंबी, आंबे, दाळिंब, टोमॅटो, भेंडी या सारखी भाजी पाल्याची पिके घेऊन शेतकऱ्यांनी उत्पादनाचे विक्रम केले आहेत.

या श्रमाला वैज्ञानिकतेची जोड देऊन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शिवाजी महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली. शेतकऱ्यांना मातीच्या प्रकाराची वैज्ञानिक माहिती होऊन मातीचा पोत पाहुन शेतकऱ्यांनी पिकाची निवड करावी व त्यानुसर नत्र, पालाश व स्फुरद व इतर अन्न जैविक घटक पिकांना द्यावेत व उत्पादन वाढावे हा प्रयोगशाळेचा उद्देश आहे. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अशी प्रयोगशाळा स्थापन करून छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाने व सामाजिक बांधिलकी जपली आहे. ही प्रयोगशाळा कृषि मंच अंतर्गत स्थापना करण्यात आली. महाविद्यालयातील कृषि मंचाकडुन आता पर्यंत शेतकऱ्यांसाठी दर्जेदार कार्यक्रम घेण्यात आले आहेत. या प्रयोगशाळे कडुन मंचाच्या सदस्यांना बारा घटकांचे परीक्षण विनामुल्य करुन दिल्या जाणार आहे. या प्रयोगशाळेचे उद्घाटन औरंगाबाद जिल्हाचे जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.



या प्रयोगशाळेचे उद्घाटन करतांना जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण म्हणाले की, माणुस जसे स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतःच्या शरीराची तपासणी करतो, त्याचप्रमाणे जमिनीच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी माती परीक्षण करणे गरजेचे आहे. कन्नड तालुक्यातील अनेक नामवंत शेतकऱ्यांच्या शेतीला भेट दिल्याचा अनुभव सांगुन कन्नड मधील शेती अत्यंत उर्जित अवस्थेत आहे व या प्रयोगांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शेतीच्या पुढचा टप्पा म्हणजे शेतकऱ्यांच्या मुलांनी मार्केटिंग मध्ये येणे गरजेचे आहे. नविन पिढीने आपल्या भागात निर्माण झालेल्या महामार्गाचा योग्य वापर करुन शेतकऱ्यांची उत्पादने सरळ ग्राहकांना विकण्याची केंद्रे सुरु करावीत. शेतकऱ्यांची उत्पादने चांगली पॅकेजिंग करुन विकावीत व हे तंत्रे विद्यार्थ्यांना शिकवावीत. यात ऑनलाईन मार्केटिंगचाही समावेश करावा असे अवाहन त्यांनी केले.या प्रसंगी बाळराजे मूळिक, आमदार उदयसिंग राजपूत, कृषिभुषण पोपटराव दापके, आदींची भाषणे झाली. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार, जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण, आमदार उदयसिंग राजपुत, उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते, तहसिलदार संजय वारकड, मुख्याधिकारी न.प.नंदकिशोर भोंबे, कृषिअधिकारी बाळराजे मुळीक, नवोदय विद्यालयाचे प्राचार्य पंकज देशमुख, कृषिभूषण पोपटराव दापके, कृषिभूषण संतोष जाधव, कृषिभूषण अजय जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर, कोषाध्यक्ष चंद्रकांत देशमुख, बाबासाहेब मोहिते, विशाल आहेर, प्राचार्य डॉ.व्ही.एन.भोसले, उपप्राचार्य डॉ.बी.के.मगर, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

Kannad * Shivaji College Library *

दैनिक दिव्य मराठी

औरंगाबाद, शनिवार, ८ जानेवारी, २०२२ | ४

**दिव्य मराठी विशेष** • जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांचे प्रतिपादन, माती परीक्षण प्रयोगशाळेचे उद्घाटन

# शेतकऱ्यांच्या मुलांनी मार्केटिंगमध्ये येणे गरजेचे

प्रतिनिधी | कन्नड



नवोदय विद्यालय परिसरातील विकासकामांच्या लोकार्पण सोहळाप्रसंगी जिल्हाधिकारी सुनील चव्हाण.

माणूस जसे स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतःच्या शरीराची तपासणी करतो, त्याचप्रमाणे जमिनीच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी माती परीक्षण करणे गरजेचे असल्याचे मत जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी केले. कन्नड येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार, आमदार उदयसिंग राजपूत, उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसीलदार संजय वारकड, मुख्याधिकारी न.प. नंदकिशोर भोंबे, कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, नवोदय विद्यालयाचे प्राचार्य पंकज देशमुख, कृषिभूषण पोपटराव दापके, संतोष जाधव, अजय जाधव, अशोकराव आहेर, चंद्रकांत देशमुख, बाबासाहेब मोहिते, विशाल अ.े.र, प्राचार्य डॉ.व्ही.एन.भोसले, उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले की, कन्नड तालुक्यातील अनेक नामवंत शेतकऱ्यांच्या शेतीला भेट दिल्याचा अनुभव सांगुन कन्नडमधील शेती अत्यंत उर्जितावस्थेत आहे व या प्रयोगांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शेतीच्या पुढचा टप्पा म्हणजे शेतकऱ्यांच्या मुलांनी मार्केटिंगमध्ये येणे गरजेचे आहे. नवीन पिढीने आपल्या भागात निर्माण झालेल्या महामार्गाचा योग्य वापर करून शेतकऱ्यांची उत्पादने सरळ ग्राहकांना विकण्याची केंद्रे सुरू करावीत. शेतकऱ्यांची उत्पादने चांगली पॅकेजिंग करून विकावीत व हे तंत्र विद्यार्थ्यांना शिकवावीत. यात ऑनलाइन मार्केटिंगचाही समावेश करावा असे अवाहन त्यांनी केले. केंद्र व राज्य सरकारच्या विविध कौशल विकास योजनेचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, त्यात सरकार ज्ञान व आर्थिकदृष्ट्याही मदत करते. त्यासाठी सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

मानसिंग पवार म्हणाले की, 'सामाजिक बांधिलकीतून उभारलेल्या या मातीच्या प्रयोगशाळेतून होणाऱ्या परीक्षणासाठी कुठलीही फीस आकारली जाणार नाही.' ही प्रयोगशाळा अजून समृद्ध केली जाईल, असेही ते म्हणाले.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
शेखर मांडे

10/01/2022

Shivaji College Library Kannad

# माती परीक्षण प्रयोगशाळेचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा, वृत्तसेवा**
**कन्नड, दि. ८ जानेवारी -**

कन्नड येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली. या प्रयोगशाळेचे उद्घाटन औरंगाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. कन्नड तालुका भौगोलिक दृष्ट्या मराठवाड्यातील एक अत्यंत समृध्द तालुका आहे. उंच डोंगर, सखल व सपाट व सुपिक जमीन, शिवना, अंजना, गांधारी सारख्या नद्या, अंबाडी, टाकळी, नागद, पिशोर येथील धरणे यामुळे निर्माण झालेली शेतीची समृद्ध परंपरा कन्नड तालुक्यात आहे.

कन्नड तालुक्यातील शेतकरी अत्यंत मेहनती व प्रयोगशील आहे. केळी व उसाच्या पारंपारिक पिकाबरोबरच अद्रक, हळद, सारखी पिके, मोसंबी, आंबे, दाळिंब सारखी फळे व टोमॅटो, भेंडी सारखी भाजी पाल्याची पिके घेऊन शेतकऱ्यांनी उत्पादनाचे विक्रम केले आहेत. या श्रमाला वैज्ञानिकतेची जोड देऊन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शिवाजी महाविद्यालयात माती परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली. शेतकऱ्यांना मातीच्या प्रकाराची वैज्ञानिक माहिती होऊन मातीचा पोत पाहुन शेतकऱ्यांनी पिकाची निवड करावी व त्यानुसर नत्र, पालाश व स्फुरद व इतर अन्न जैविक घटक पिकांना द्यावेत व उत्पादन वाढावे हा प्रयोगशाळेचा उद्देश आहे. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अशी प्रयोगशाळा स्थापन करुन छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाने व सामाजिक बांधिलकी जपली आहे. ही प्रयोगशाळा कृषि मंच अंतर्गत स्थापना करण्यात आली. महाविद्यालयातील कृषि मंचाकडुन आता पर्यंत शेतकऱ्यांसाठी दर्जेदार कार्यक्रम घेण्यात आले आहेत. या प्रयोगशाळेकडुन मंचाच्या सदस्यांना बारा घटकांचे परीक्षण विनामुल्य करुन दिल्या जाणार आहे. या प्रयोगशाळेचे उद्घाटन औरंगाबाद जिल्हाचे जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रयोगशाळेचे उद्घाटन करतांना जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण म्हणाले की, 'माणुस जसे स्वतः च्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतःच्या शरीराची तपासणी करतो, त्याचप्रमाणे जमिनीच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी माती परीक्षण करणे गरजेचे आहे. कन्नड तालुक्यातील अनेक नामवंत शेतकऱ्यांच्या शेतीला भेट दिल्याचा अनुभव सांगुन कन्नड मधील शेती अत्यंत उर्जित अवस्थेत आहे व या प्रयोगांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शेतीच्या पुढचा टप्पा म्हणजे शेतकऱ्यांच्या मुलांनी मार्केटिंग मध्ये येणे गरजेचे आहे. नविन पिढीने आपल्या भागात निर्माण झालेल्या महामार्गाचा योग्य वापर करुन शेतकऱ्यांची उत्पादने सरळ ग्राहकांना विकण्याची केंद्रे सुरु करावीत. शेतकऱ्यांची उत्पादने चांगली पॅकिंग करुन विकावीत व हे तंत्र विद्यार्थ्यांना शिकवावीत. यात ऑनलाईन मार्केटिंगचाही समावेश करावा असे अवाहन त्यांनी केले. केंद्र व राज्य सरकारच्या विविध कौशल विकास योजनेचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, त्यात सरकार ज्ञान व आर्थिक दृष्ट्या ही मदत करते. त्यासाठी सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार यांनी अध्यक्षीय समारोप



केला. त्याप्रसंगी मनोगत व्यक्त करतांना ते म्हणाले की, 'सामाजिक बांधिलकीतुन उभारलेल्या या मातीच्या प्रयोगशाळेतुन होणाऱ्या परीक्षणासाठी कुठलीही फीस आकारली जाणार नाही' ही प्रयोगशाळा अजुन समृध्द केल्या जाईल व कृषिमंच अंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केल्या जातील. याप्रसंगी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बाळराजे मूळिक, आमदार उदयसिंग राजपूत, कृषिभुषण पोपटराव दापके आदींची भाषणे झाली. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार, जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण, आमदार उदयसिंग राजपुत, उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते, तहसिलदार संजय वारकड, मुख्याधिकारी न.प.नंदकिशोर भोंबे, कृषिअधिकारी बाळराजे मुळीक, नवोदय विद्यालयाचे प्राचार्य पंकज देशमुख, कृषिभूषण पोपटराव दापके, कृषिभूषण संतोष जाधव, कृषिभूषण अजय जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर, कोषाध्यक्ष चंद्रकांत देशमुख, बाबासाहेब मोहिते, विशाल आहेर, प्राचार्य डॉ.व्ही. एन.भोसले, उपप्राचार्य डॉ.बी.के.मगर सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.विजय भोसले यांनी करुन संस्थेच्या विकासाचा परीचय करून दिला. सुत्रसंचालन डि.शिंदे तर आभार अनिल क्षिरसागर यांनी मानले.

13/01/2022

Shivaji College Library * Kannad *

महाराष्ट्र टाइम्स

# डॉ. कस्तुरे यांचा सेवा गौरव कार्यक्रम



कन्नड : शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील डॉ. विद्या दामोदर कस्तुरे ३३ वर्षांच्या सेवेनंतर नुकत्याच निवृत्त झाल्या. या निमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा 'सेवा गौरव' कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर होते. तर प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, संजय मुळे, यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयीन प्राध्यापक, तसेच एमसीव्हीसी व कनिष्ठ विद्यालयाच्या प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने ही सत्कार करण्यात आला. डॉ. कस्तुरे यांनी नियुक्तीपासून आजपर्यंतच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. प्रातिनिधीक स्वरुपात डॉ. प्रकाश खेत्री, डॉ. गोविंद बुरसे, डॉ. डी. डब्ल्यू. शिंदे, डॉ. अतिष मेहेत्रे यांनी मनोगत व्यक्त केले.

College Library Kannad

16/01/2022

मराठवाडा साथी




प्रतिनिधी-राजेंद्र नेवगे

# नामांतर हा सामाजिक परिवर्तनाचा लढा होता- डॉ. अनिल क्षीरसागर

**मराठवाडा साथी न्यूज**

**कन्नड ।** मराठवाडा प्रदेश हा विकासापासून वंचित होता. येथे शिक्षणाची सुविधा निर्माण व्हावी आणि शैक्षणिक चळवळ रुजावी यासाठी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाड्यात शैक्षणिक चळवळ गतिमान केली. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी अनेकांनी मोर्चे, आंदोलने केली. सर्वस्वाचा त्याग केला. नामांतर लढा हा केवळ पाटी बदलण्याचा कार्यक्रम नव्हता तर तो सामाजिक समतेचा, न्यायाचा आणि अस्मिता व अस्तित्वाचाही लढा होता असे प्रतिपादन प्रा. डॉ. अनिल क्षिरसागर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिना निमित्त येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्ष स्थानी उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर होते. मंचावर डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य नानाभाऊ मगरे, नॅकचे समन्वयक डॉ. विजय मातकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर म्हणाले की विद्यापीठाचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा . असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. आभार डॉ. मीना बडगुळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ. शिवाजी हुसे , डॉ. पोपटराव आव्हाळे, डॉ. उदय डोंगरे, वसंत बोरसे, रवी भागवत आदींनी प्रयत्न केले.

16/01/2022

Shivaji College Library Kannad



# जिल्ह्यात ठिकठिकाणी विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त कार्यक्रम साजरे










71

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कन्नड ●** मराठवाडा प्रदेश हा निजामाच्या वंचित होता. येथे शिक्षणाची सुविधा निर्माण व्हावी व शैक्षणिक मागास असलेल्या समाजासाठी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाड्यात शैक्षणिक चळवळ गतिमान केली. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी अनेकांनी मोर्चे, आंदोलने केली. सर्वांनी त्याग केला. नामांतर लढा हा केवळ नाव बदलण्याचा कार्यक्रम नव्हता तर तो सामाजिक समतेचा, न्यायाचा आणि अस्मिता व अस्तित्वासाठी लढा होता असे प्रतिपादन प्रा.डॉ.अनिल शिरसाट यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रम प्रसंगी शुक्रवारी (ता.१४) केले. अध्यक्ष स्थानी उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब [illegible] होते. मंचावर डॉ.भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य नानासाहेब [illegible], नॅक समन्वयक डॉ. विजय भालकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ.शिवाजी हुसे यांनी केले. आभार डॉ.बीना वडगुळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ.शिवाजी हुसे, डॉ.वेंकटराव आकाशे, डॉ.उदय डोंगरे, वसंत थोरवे, रवी भालकर आदींनी प्रयत्न केले.

**फुलंब्री ●** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा नामविस्तार दिना निमित्ताने फुलंब्री येथे शुक्रवारी दि.१४ रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष राजू प्रधान, महिला तालुकाध्यक्षा पुष्पाताई मोरे, शहराध्यक्ष भगवान [illegible], सुनिल प्रधान, रणजीत वाहुळ, श्यामराव शिरसाठे, बाबासाहेब वाहुळे, राहुल डोंगरे, योगेश प्रधान, सचिन पगारे, कुलदीप जाधव, गौतम पंडागळे, शंकर [illegible], विनोद गायकवाड, संजय गायकवाड, अशोक गायकवाड, संतोष खरात, मनिषा निकाळजे, रंजना प्रधान, मंदाबाई भोसले, चंपाबाई मोरे, उज्ज्वला केदारे, सोनाली वाहुळ, लक्ष्मीबाई वाहुळ, इंदुबाई वाहुळ आदी वंचित बहुजन आघाडीचे शहर व तालुकास्तरीय कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

**खुलताबाद ●** तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्यावतीने नामविस्तार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. नामांतर लढ्यातील शहीद झालेल्या सर्व शहिदांना अभिवादन करण्यात आले. यावेळी युवा जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर खरात, तालुकाध्यक्ष [illegible], तालुका सचिव संजय जाधव, तालुका कार्याध्यक्ष बाबुराव गवळी, युवा तालुकाध्यक्ष राहुल काळे, महिला तालुकाध्यक्ष रमाबाई शिंदे, शहराध्यक्ष अप्पा जाधव, तालुका संघटक भास्कर वाकेकर, [illegible], [illegible] सर्कल प्रमुख [illegible], [illegible] सर्कल प्रमुख [illegible], उप सर्कल प्रमुख [illegible], अशोक पवार आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**अजिंठा ●** डॉ.बाबासाहेबांचे विचार घरा, घरात पोचवले, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते [illegible] यांनी केले. येथील बौद्ध विहार येथे शुक्रवारी दि.१४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना म्हणाले की, १९७८ ते १९९४ या नामांतर चळवळीमध्ये अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली, बलिदान केले अशा भिम सैनिकांना [illegible] बाबासाहेबांच्या चरणी अभिवादन केले. समाजाने बाबासाहेबांचे विचार घरा घरात पोहचवण्याचे व समाज जागृत करण्याचे कार्य हाती घ्यावे. तसेच समाज बांधवांनी संघटित राहून समाजहित कार्य करावेत, असे विचार [illegible] यांनी मांडले. [illegible] सामाजिक कार्यकर्ते [illegible], ग्रा.प.सदस्य प्रवीण शिरसाट, सुरेश शिरसाट यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी [illegible], आनंद [illegible], [illegible], उत्तम शिरसाट, [illegible], अविनाश शिरसाट, प्रभू [illegible] कार्यकर्ते हजर होते.

Shivaji College Library Kannad

18/01/2022

www.maharashtratimes.com

# महाराष्ट्र टाइम्स

अग्रलेख
आजचा गणपती


सोमवारचे तापमान
औरंगाबाद

# नामांतर लढा हा परिवर्तनाचा

## डॉ. अनिल क्षीरसागर यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, कन्नड

नामांतर लढा हा सामाजिक परिवर्तनाचा लढा होता, याबरोबरच तो सामाजिक समतेचा, न्यायाचा आणि अस्मिता व अस्तित्वाचाही लढा होता, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अनिल क्षीरसागर यांनी केले.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले, 'मराठवाडा प्रदेश हा विकासापासून वंचित होता. येथे शिक्षणाची सुविधा निर्माण व्हावी आणि शैक्षणिक चळवळ रुजावी यासाठी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाड्यात शैक्षणिक चळवळ गतिमान केली. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी अनेकांनी मोर्चे, आंदोलने केली. सर्वस्वाचा त्याग केला.'

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भाऊसाहेब मगर होते. या वेळी डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य नानाभाऊ मगरे, नॅकचे समन्वयक डॉ. विजय मातकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर म्हणाले, 'विद्यापीठाचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. डॉ. मीना वडगुळे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. शिवाजी हुसे, डॉ. पोपटराव आव्हाळे, डॉ. उदय डोंगरे, वसंत बोरसे, रवी भागवत आदींनी प्रयत्न केले.

Kannad * Shivaji College Library *

CMYK

तरुण भारत

३

बुधवार, दि.२६ जानेवारी २०२२

# ग्रामीण भागात वाचनालये सुरू व्हावीत



**तभा, वृत्तसेवा**
**कन्नड, दि. २५ जानेवारी -**

ग्रामीण भागातील विद्यार्थी व युवा पिढी मोबाईल च्या आहारी गेल्यामुळे तसेच व्यसनाधीनता दिवसेदिवस वाढत आहे. त्यामुळे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे बुद्धिजिवी वर्गांनी आपापल्या गावी किंवा परिसरात ग्रामीण भागात वाचनालये सुरू करावीत असे प्रतिपादन कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केले. शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. व्ही.पी. देशपांडे यांनी त्यांच्या गावी पार्डी ता. मानवत जि. परभणी येथे वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ कै. प्रभाकरराव पार्डिकर सार्वजनिक वाचनालय पार्डी ता. मानवत वाचनालय सुरु केले आहे. या वाचनालयास तिफण वाचक चळवळ व मराठी विभाग शिवाजी महाविद्यालय कन्नड यांच्या वतीने २१ पुस्तकांचा संच भेट देण्यात आला. ग्रामीण भागात वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी यासाठी तिफण वाचक चळवळ प्रयत्नशील आहे. यावेळी उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, प्रा. विजय देशमुख, डॉ. व्ही.पी. देशपांडे, डॉ. उदय डोंगरे, तिफण चे संपादक डॉ. शिवाजी हुसे ,डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. जे. व्ही . भेलोंडे ,डॉ. प्रकाश खेत्री, डॉ. प्रकाश महाजन आदींची उपस्थिती होती.

तरुण भारत
www.tarunbharat.org
बुधवार, दि. २ फेब्रुवारी २०२२

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**तभा, वृत्तसेवा**
**कन्नड, दि. १ फेब्रुवारी -**

लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांचे महाराष्ट्रातील राजकीय, शैक्षणिक, सहकार, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्या विचार व जीवन कार्याची ओळख नव्या पिढींना व्हावी. उत्तमोत्तम वक्ते तयार व्हावेत या महत्वपूर्ण उद्देशाने येथील शिवाजी महाविद्यालयात हवामान बदलाचा शेतकरी जीवनावर होणारा परिणाम या विषयावर मराठी विभागाच्या वतीने लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या स्मृति प्रित्यर्थ राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पधेचे आयोजन (२ फेब्रवारी) रोजी सकाळी ९ वा.करण्यात आले आहे.



स्पर्धेचे हे सहावे वर्ष आहे. यास्पर्धेचे उद्घाटन कन्नड नगर परिषदेचे प्रशासक नंदकिशोर भोंबे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक तथा सावित्रिबाई फुले कन्या विद्यालयाचे अध्यक्ष डॉ.शिंदे हे राहणार आहेत. तर बारामती ग्रोचे जनरल मॅनेजर देशमुख, डॉ.भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ.महाले, गौताळा व्हॅली स्कुलचे अध्यक्ष कृष्णा पाटील निकम, संस्थेचे संचालक लक्ष्मणराव देशमुख, प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर यांची उपस्थिती लाभणार आहे. तर पारितोषीक वितरण व समारोप समारंभासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या समारोप समारंभासाठी कन्नडचे उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसिलदार संजय वारकड, संस्थेचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर, सचिव डॉ.निकम, कोषाध्यक्ष चंद्रकांत देशमुख, सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालय भिलपलटणचे अध्यक्ष बाबासाहेब मोहिते यांची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर, मराठी विभाग प्रमुख डॉ.शिवाजी हुसे, डॉ.रामचंद्र झाडे यांनी केले आहे.

बुधवार, २ फेब्रुवारी २०२२

पुण्य नगरी ३

# कन्नड येथे आज राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**कन्नड शहर :** शहरातील शिवाजी महाविद्यालयात सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बुधवारी (दि.२) राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पधेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन कन्नड नगर परिषदेचे प्रशासक नंदकिशोर भोंबे यांच्या हस्ते होणार आहे. संस्थेचे संचालक डॉ. डी. डी. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या स्पर्धेस प्रमुख पाहुणे म्हणून बारामती ॲग्रोचे जनरल मॅनेजर एम.एम.देशमुख यांची उपस्थिती लाभणार आहे. तर पारितोषीक वितरण व समारोपाचा कार्यक्रम मानसिंह पवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

Shivaji College Library Kannad

02/02/2022

महाराष्ट्र टाइम्स

# वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**कन्नड :** शहरातील शिवाजी महाविद्यालयात मराठी विभागातर्फे लोकनेते तथा सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बुधवारी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे सहावे वर्ष आहे. स्पर्धेचे उद्घाटन कन्नड नगर परिषदेचे प्रशासक नंदकिशोर भोंबे यांच्या हस्ते होणार आहे.


या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. डी. डी. शिंदे, तर बारामती ॲग्रोचे जनरल मॅनेजर एम. एम. देशमुख यांची उपस्थिती लाभणार आहे. तर पारितोषिक वितरण व समारोप कार्यक्रम श्री छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यामध्ये कौतिकराव ठाले पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दैनिक
दखनी स्वराज्य
सामान्यांच्या न्यायहक्कासाठी

बुधवार दि. २ फेब्रुवारी २०२२ | संपादक : संतोष श्रीमंतराव तांबे | 9850017175

Shivaji College Library Kannad

# कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात लोकनेते बाळासाहेब पवार राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन



दै.दखनी स्वराज्य /वृत्तसंस्था - कन्नडः लोकनेते , सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांचे महाराष्ट्रातील राजकीय, शैक्षणिक , सहकार, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्या विचार व जीवन कार्याची ओळख नव्या पिढींना व्हावी. उत्तमोत्तम वक्ते तयार व्हावेत या महत्वपूर्ण उद्देशाने येथील शिवाजी महाविद्यालयात हवामान बदलाचा शेतकरी जीवनावर होणारा परिणाम या विषयावर मराठी विभागाच्या वतीने लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या स्मृति प्रित्यर्थ राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पधेचे आयोजन ( ता. फेब्रवारी ) रोजी सकाळी .वा.करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे सहावे वर्ष आहे. या स्पर्धेचे उद्घाटन कन्नड नगर परिषदेचे प्रशासक नंदकिशोर भोंबे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक तथा सावित्रिबाई फुले कन्या विद्यालयाचे मा. अध्यक्ष डॉ. डी.डी. शिंदे हे राहणार आहेत. तर बारामती ग्रो चे जनरल मॅनेजर एम.एम. देशमुख , डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए.के. महाले, गौताळा व्हॅली स्कुलचे अध्यक्ष कृष्णा पाटील निकम , संस्थेचे संचालक लक्ष्मणराव देशमुख , प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर यांची उपस्थिती लाभणार आहे. तर पारितोषीक वितरण व समारोप समारंभासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या समारोप समारंभासाठी कन्नड चे उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसिलदार संजय वारकड, संस्थेचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर, सचिव डॉ. पी.के निकम, कोषाध्यक्ष चंद्रकांत देशमुख, सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालय भिलपलटण चे अध्यक्ष बाबासाहेब मोहिते यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले , उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले आहे.

Shivaji College Library Kannad

सकाळ » TODAY

औरंगाबाद, गुरुवार, ३ फेब्रुवारी २०२२ ३

# जीवनातील प्रत्येक क्षेत्रात वक्तृत्वाचा फायदा

## नंदकिशोर भोंबे यांचे कन्नड येथील वक्तृत्व स्पर्धेत प्रतिपादन

**कन्नड ता.२ (बातमीदार) जे जे चांगले आहे ते संकलित करून वक्तृत्व स्पर्धेत मांडता येणे आवश्यक आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वक्तृत्वाचा फायदा होतो, असे प्रतिपादन नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक नंदकिशोर भोंबे यांनी केले आहे.**

येथील शिवाजी महाविद्यालयात लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या स्मृती दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. ''हवामान बदलाचा शेतकरी जीवनावर होणारा परिणाम'' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

यावेळी ते म्हणाले की, आपल्या जीवन अनुभवांची सांगड घालत विद्यार्थ्यांनी अनुभव शब्दबद्ध करावेत.

यावेळी डॉ. प्रतिभा अहिरे म्हणाल्या की, प्रभावी वक्तृत्वासाठी चौफेर वाचन, चिंतन करावे लागते. सातत्य लागते. सर्वोत्तम जे जे आहे ते संग्रही ठेवावे लागते. विषयानुरूप कमी वेळेत मांडणी करणे आवश्यक असते. वक्त्याने किती बोलावे, कुठे थांबावे याचेही भान ठेवणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक आहेर होते. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, वक्तृत्व ही यशाची गुरुकिल्ली आहे.

यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा. शिवाजी हुसे, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, उपप्राचार्य नानासाहेब मगरे यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रथम पारितोषिक प्रणाली पाटील (यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय), द्वितीय तेजस्विनी नाथराव केंद्रे (शिव छत्रपती शिवाजी महाविद्यालय), तर तृतीय अश्विनी शेषराव घुगे (शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालय), तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक रामहरी कल्याण जाधव, दक्षता भगवान ठाकरे यांना मिळाले. परीक्षक म्हणून प्रा.रंगनाथ लहाने, ज्ञानेश्वर दाभाडे, स्वाती जंगले यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. के.एल. भानुसे यांनी केले. आभार डॉ.रामचंद्र झाडे यांनी मानले.



**कन्नड : शिवाजी महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांसोबत अशोक आहेर, प्राचार्य डॉ.विजय भोसले, प्रा. प्रतिभा अहिरे, प्रा.शिवाजी हुसे आदी मान्यवर.**

Shivaji College Library Kannad

दैनिक मराठवाडा साथी
औरंगाबाद, गुरुवार 03.02.2022



# योग्य भाषण देण्यासाठी उत्तम तयारीची आवश्यकता : डॉ.प्रतिभा अहिरे

## शिवाजी महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

कन्नड। योग्य भाषण देण्यासाठी उत्तम तयारीची आवश्यकता असते त्यासाठी विद्यार्थ्यांनी सखोल वाचन करावे व बोलते वेळी कसे, किती व कोणत्या भाषेत बोलावे व कुठे थांबावे हे चांगले अभ्यासले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. प्रतिभा अहिरे यांनी केले.

लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या स्मृतिनिमीत्त शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा पार पडली. यावर्षी "हवामान बदलाचा शेतकरी जीवनावर होणारा परिणाम" या विषयावर ही स्पर्धा घेण्यात आली.

उद्घाटक म्हणून कन्नड नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रशासक नंदकिशोर भोंबे हे होते. त्यांनी अगदी सोप्या व प्रभावी भाषेत मार्गदर्शन केले. 'आपल्या जीवन अनुभवांची सांगड घालत विद्यार्थ्यांनी आपले अनुभव अगोदर शब्दबध्द करावेत. योग्य पध्दतीने संकलित करावेत व नेटकेपणे सादर करावीत असे ते म्हणाले' या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या डॉ.प्रतिभा अहिरे यांनी

### राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे विजेते

- प्रथम पारितोषिक प्रणाली पांडुरंग पाटील, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.
- व्दितीय पारितोषिक तेजस्विनी नाथराव केंद्रे, शिवछत्रपती महाविद्यालय, औरंगाबाद.
- तृतीय पारितोषिक अश्विनी शेषराव घुगे, शासकीय तंत्र निकेतन, औरंगाबाद.
- उत्तेजनार्थ प्रथम रामहरी कल्याण जाधव, एम.पी.विधी महाविद्यालय, औरंगाबाद.
- उत्तेजनार्थ व्दितीय दक्षता भगवान ठाकरे, एम.पी. विधी महाविद्यालय, औरंगाबाद.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक आहेर हे होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य विजय भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना योग्य वक्तृत्व कला ही यशाची गुरुकिल्ली आहे असा संदेश दिला. उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे डॉ.शिवाजी हुसे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले. व्यासपिठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर, कनिष्ठ महाविद्यालयचे उपप्राचार्य एन.एस.मगरे हे उपस्थित होते.

या स्पर्धेमध्ये पुणे, वारणानगर, नांदेड व महाराष्ट्रातील इतर ठिकाणाहून एकुण १८ स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेच्या समारोप प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय भोसले म्हणाले की, स्पर्धकांनी आपल्या अभ्यासाच्या आधारे आपले व्यक्तिमत्व निर्माण करावे. विद्यार्थ्यांनी वेगवेगळे ग्रंथ, अभ्यासाची पुस्तके, सुभाषिते, म्हणी यांचा अर्थ समजून घ्यावा. हा अभ्यास आपल्या व्यक्तिमत्वामध्ये निर्णायक असेल व तो स्पर्धा परीक्षा व करिअर निवडीमध्ये उपयोगी ठरेल. विद्यार्थ्यांनी केलेला अभ्यासच राष्ट्रनिर्मिती साठी आधार ठरेल. समारोपाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.के.एल भानुसे यांनी केले तर आभार मराठी विभागाचे प्रा. रामचंद्र झाडे यांनी मानले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रसिध्द वक्ते प्रा.रंगनाथ लहाने, कवि ज्ञानेश्वर दाभाडे व शिक्षीका स्वाती जंगले यांनी काम पाहिले.

Kannad Shivaji College Library

दैनिक मराठवाडा साथी
औरंगाबाद, बुधवार
16.02.2022

# मूर्त, शिल्प संशोधन संस्थेचे दुसरे राष्ट्रीय अधिवेशन कन्नडला

**मराठवाडा साथी न्यूज**

***औरंगाबाद। भारतामध्ये एकूण चौसष्ट कला आहेत. त्यातील मूर्ति व शिल्पांचा अभ्यास करण्यासाठी मूर्ति व शिल्प संशोधन संस्था स्थापन करण्यात आली. त्याचे दुसरे राष्ट्रीय अधिवेशन औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात मार्च महिन्याच्या चौथ्या आठवड्यामध्ये आयोजित करण्यात येणार आहे. हे दोन राष्ट्रीय दिवसीय अधिवेशन असून शिल्पकला व स्थापत्य हा अधिवेशनाचा मुख्य विषय असणार आहे.***

या राष्ट्रीय अधिवेशनात एक परिसंवाद व चार शोध निबंध वाचनाचे सत्र होणार आहेत. त्यामध्ये प्रतिक विचार, मुर्तीकलेचा उगम, मूर्तिपूजेचा उध्दव व विकास, मूर्तिविज्ञान, मूर्तिविज्ञानाचे वाङ्मयीन स्त्रोत, मूर्ति घडवण्याची माध्यमे, प्रमाण पध्दती वैशिष्ट्ये, मूर्तिची वाहने, आयुधे, स्थान, आसन, मुद्रा, वस्त्र आणि अलंकार, विविध कालखंडातील, विविध राजवटीतील मूर्तीकलेची वैशिष्ट्ये. हिंदू मूर्तिशास्त्र वैष्णव मूर्तिकला विष्णूच्या भव व विभव अवतार मूर्ति, विष्णूच्या स्थानक, सकिरण व संयुक्त मूर्ति, वैष्णव परिवारातील देवता, शैव मूर्ति लिंगपूजन, शिवलिंगे व त्यांचे विविध प्रकार, शिवाच्या सौम्य, स्थानक व संयुक्त विशेष मूर्ति, शिवाच्या संहार, अनुग्रह व दक्षिणा मूर्ति, वीरभद्र व भैरव मूर्ति, शिव परिवारातील देवता शक्ती स्त्री देवता प्राचीन स्त्री देवता, लक्ष्मी, सरस्वती पार्वती व त्यांची विविध रुपे दुर्गा चामुंडा व त्यांची विविध रूपे, सप्तमातृका, योगिनी, विष्णूच्या स्त्री शक्ती नदी देवता मनसादेवी ब्रम्हय्य अष्टदिकपाल गणेश कार्तिकेय सुर्य नवग्रह संयुक्त देवता आणि व्यांतरदेवता गरूड नंदी नाग हनुमान यक्ष आयुधपुरूष व आयुध स्त्रीया व्याल गंधर्व किन्नर विधाधर बौद्ध मूर्तीशास्त्र बौद्ध मूर्तिशास्त्रांतगरगत बौद्ध प्रतिके, बौद्ध प्रतिमांचे आगमन, बौद्ध प्रतिमा निर्माणाचे आधार लक्षण ग्रंथातील बुद्ध प्रतिमा बुद्ध, प्रतिमेच्या मुद्रा, दशमुद्रा, बुध्द जीवन दर्शन शिल्प, बौध्द प्रतिमा संघ बोधिसत्व मानुषी बुद्ध ब्रम्हा शक मार नाग अवलोकितेश्वर त्याचे प्रकार ध्यानी बुद्ध आणि त्यांचा देवता इतर देवता यक्ष जैन मूर्तिशास्त्र जैन मूर्तिशास्त्रांतगरगत जैन प्रतिके, चोवीस तिर्थंकर, तिर्थंकरांचे शासन, देवदेवता, जैन यक्ष देवता व इतर प्रतिमा. देवांगना वा सुरसुंदरी शिल्पे मिथुन शिल्पे, कामशिल्पे. शिल्पकलेतील विविध प्राणी तसेच मंदिरावर अंकित असलेली विविध स्वरूपाची रूपे, वज्रलेप विधी, लयन व मंदिर स्थापत्य त्याच्या उगम, विकास, प्रकार व उपप्रकार, वैशिष्ट्ये वाङ्मयीन साधने, ग्रामदैवता, विरगळ व त्यांचे प्रकार सतीशीळा, गधेगाळ धेनुगळ, व्याधरळ, सिंहगळ स्मारकाशिळा या विषयांव्यातिरिक्त शिल्पकला व स्थापत्य या संबंधीची कोणत्याही विषयावर शोधनिबंध लिहिता येईल तसेच यासोबतच मूर्तिशास्त्र व स्थापत्यकला यांचे आजच्या काळात असलेले महत्त्व त्यांचा अभ्यास करतांना अभ्यासाच्या पारंपारिक पध्दतीसोबत आधुनिकतेची सांगड त्यांच्या जतन व संवर्धनाची आवश्यकता स्वरूप व त्याकरिताच्या उपाययोजना या बाबींचाही समावेश असेल याचा संशोधकाने विचार करावा.

या अधिवेशनासाठी आपण संशोधनपर लेख जरूर पाठवावे. ठरलेले निकष पूर्ण करणारे व प्रकाशन शुल्क भरलेल्यांचेच शोध निबंध प्रकाशित केले जातील असे आवाहन परिषदेचे अध्यक्ष डॉ झाकीर पठाण व सचिव डॉ संजय पाईकराव यांनी केले आहे

लोकमत समाचार
www.lokmatnews.in
औरंगाबाद, बुधवार 16 फरवरी 2022 3

## मूर्ति व शिल्प संशोधन संस्था का अधिवेशन

**औरंगाबाद.** मूर्तिकला और शिल्पकला का अध्ययन करने के लिए मूर्ति व शिल्प संशोधन संस्था की स्थापना की गई है. इस संस्था का दूसरा राष्ट्रीय अधिवेशन कन्नड़ तहसील के शिवाजी महाविद्यालय में मार्च माह के अंतिम सप्ताह में आयोजित होगा. संस्थान अध्यक्ष डॉ जाकिर पठान व सचिव डॉ संजय पाईकराव ने बताया कि अधिवेशन में शिल्पकला व स्थापत्य कला पर चर्चा होगी.

16/02/2022

महाराष्ट्र टाइम्स

Shivaji College Library * Kannad *

# अधिवेशनस्थळी भेट

**कन्नड :** औरंगाबाद येथील मूर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे दुसरे अधिवेशन कन्नड येथे २५ व २६ मार्च २०२२ रोजी शिवाजी महाविद्यालयामध्ये होणार आहे.

या अधिवेशनाची पूर्वतयारी करण्याकरीता मूर्ती व शिल्प संशोधन संस्थेच्या कार्यकारणीने सोमवारी नियोजित अधिवेशनस्थळास भेट देऊन पाहणी केली. यामध्ये मूर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे अध्यक्ष डॉ. झाकिर पठाण (बदनापूर), मार्गदर्शक प्रदीप म्हैसेकर (औरंगाबाद), सचिव संजय पाईकराव (औरंगाबाद), कोषाध्यक्ष मयुरेश खडके (औरंगाबाद ), सदस्य डॉ. धम्मपाल माशाळकर (सोलापूर), डॉ. कामाजी डक (औरंगाबाद) यांच्यासह आयोजक डॉ. जगदीश भेलोंडे, सचिव डॉ. प्रकाश महाजन, प्राचार्य विजय भोसले यांची उपस्थिती होती. प्राचार्य विजय भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. अधिवेशन ऑनलाइन न घेता ऑफलाइन घेण्याचे ठरवण्यात आले.

समय ॲडस् & पब्लिकेशन
❖ प्रेस कॉन्फरन्स, ❖ प्रेस रिलीज,
❖ ॲडव्हर्टायझिंग, ❖ प्रकाशने, ❖ जॉबवर्क,
❖ मार्केटींग,

प्रसार
मराठवाड्यातील जनतेचं हक्काचं दैनिक
औरंगाबाद ❖ वर्ष १५ वे ❖ अंक १६० वा गुरुवार, दि.१७ फेब्रुवारी २०२२ ❖ कि. १ रुपये ❖ पाने ४

# मूर्ति व शिल्प परिषदेसाठी कार्यकारिणीची शिवाजी महाविद्यालयास भेट

Shivaji College Library * Kannad *

कन्नड.- मूर्ती व शिल्प संशोधन संस्था औरंगाबाद याच्या दुसऱ्या अधिवेशनाचे आयोजन येथील शिवाजी महाविद्यालयामध्ये दिनांक २५ व २६ मार्च २०२२ रोजी करण्यात येणार आहे. या अधिवेशनाची पूर्वतयारी करिता मूर्ती व शिल्प संशोधन संस्थेच्या कार्यकारणीने दिनांक १३ फेब्रुवारी २०२२ रोजी महाविद्यालयास भेट दिली. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. अधिवेशन हे आभासी (ऑनलाइन) माध्यमातून न घेता प्रत्यक्ष (ऑफलाइन) माध्यमातून घेण्याचे ठरवण्यात आले. सदरील अधिवेशनात शिल्पकला व स्थापत्य विषयावर सविस्तर चर्चा होणार आहे यात महाराष्ट्राबरोबरच महाराष्ट्राबाहेरीलही इतिहास संशोधक संवाद साधणार आहेत. तसेच अधिवेशन काळात कन्नड परिसरात असलेल्या पितळखोरा लेणीला भेट देऊन मूर्तिकला व चित्रकला समजून घेतली जाणार आहे. अधिवेशनासाठी संशोधकांकडून दि.१८ मार्च पर्यंत शोधनिबंध मागविण्यात आले आहेत. परिषदेस शोधनिबंध पाठवण्याबरोबरच संशोधकांनी सहभागी व्हावे असे आवाहन प्राचार्य डॉ.विजय भोसले यांनी केले आहे. या बैठकीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले आयोजक डॉ. जगदीश भेलोंडे स्थानिक सचिव डॉ. प्रकाश महाजन मूर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे अध्यक्ष डॉ. झाकिर पठाण (बदनापूर), मार्गदर्शक श्री प्रदिप दादा म्हैसेकर (औरंगाबाद), सचिव संजय पाईकराव (औरंगाबाद), कोषाध्यक्ष श्री मयुरेश खडके (औरंगाबाद ), सदस्य डॉ. धम्मपाल माशाळकर (सोलापूर), डॉ. कामाजी डक (औरंगाबाद) हे उपस्थित होते.



पत्रकार :- विठ्ठल शिरसे, कन्नड

17/02/2022
Shivaji College Library Kannad

# वारसा संवर्धनाला आता संशोधनाची जोड

## संस्थेचे दुसरे अधिवेशन मार्चमध्ये

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

मूर्तीशास्त्राच्या भरीव संशोधनातून प्राचीन वारशाचे दस्तावेजीकरण आणि संवर्धन करण्यासाठी 'मूर्ती व शिल्प संशोधन संस्था' सक्रिय झाली आहे. प्राचीन स्थापत्याचे बारकावे समजून घेत संशोधनाला प्रोत्साहन दिले जात आहे. संशोधकांना एकत्रित आणत कन्नडमध्ये मार्च महिन्यात राष्ट्रीय अधिवेशन होणार आहे.

प्राचीन भारताच्या पाऊलखुणा सांगणारी शिल्पकला देशाचा समृद्ध ठेवा आहे. वेरूळ-अजिंठा लेणीची स्थापत्यशैली जगभरातील अभ्यासकांसाठी कुतूहलाचा विषय आहे. भारताचा कलावारसा दाखवणाऱ्या शेकडो कलाकृती उपलब्ध आहेत. मराठवाड्यातील प्राचीन मंदिरे, स्थापत्य, मूर्ती, शिल्प व लेणी या वारशावर तथ्याधारित संशोधन करण्यासाठी औरंगाबाद येथे २०२० मध्ये 'मूर्ती व शिल्प संशोधन संस्था' स्थापन करण्यात आली. या संस्थेने करोना काळाचा अडथळा वगळता 'अॅकॅडमिक' स्तरावर सातत्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. या माध्यमातून नव्या आणि जुन्या पिढीतील इतिहास संशोधकांना एकत्र आणले आहे. मूर्तीशास्त्रात मंदिरातील शिल्प, लयनशिल्प, दुर्गशिल्प, स्थापत्यशिल्प, चित्रशिल्पांचा समावेश होतो. मूर्तिशास्त्राच्या भरीव संशोधनासाठी अभ्यास, सर्वेक्षण, दस्तावेजीकरण आणि संवर्धन अशी संस्थेच्या कार्याची व्याप्ती आहे. कला, स्थापत्य, प्रतीक, मूर्ती व शिल्प विषयावर संशोधन करणारी ही महाराष्ट्रातील एकमेव नोंदणीकृत संस्था आहे. राज्यभरातील अभ्यासक 'कला, मंदिर व मूर्तिशास्त्र'या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये विविध कालखंडातील प्राचीन वारशावर सविस्तर चर्चा करीत असत. स्थळभेटीचे आयोजन करून चर्चेला व्यापक करण्यात आले. त्यातूनच सदस्यांनी एकत्र येत संस्था स्थापन केली. संस्थेचे दुसरे राष्ट्रीय अधिवेशन कन्नड येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २५ व २६ मार्च रोजी होणार आहे. अधिवेशनात 'शिल्पकला व स्थापत्य' विषयावर सविस्तर चर्चा होणार आहे. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे अधिवेशन प्रत्यक्ष होणार आहे. राज्यभरातील इतिहास संशोधक संवाद साधणार आहेत, अशी माहिती संस्थेचे सचिव डॉ. संजय पाईकराव यांनी दिली. अधिवेशन काळात सर्वांत प्राचीन असलेल्या पितळखोरा लेणीला भेट देऊन मूर्तिकला समजून घेतली जाणार आहे. अधिवेशनासाठी संशोधकांकडून शोधनिबंध मागविण्यात आले आहेत.



प्राचीन वारशाचे संवर्धन करण्यासाठी 'मूर्ती व शिल्प संशोधन संस्था' सक्रिय झाली आहे.

> "संस्थेचे पहिले अधिवेशन बीड येथे झाले होते आणि दुसरे कन्नडला होणार आहे. अधिवेशनात अमेरिकेतील पाच संशोधक आणि राज्याबाहेरील २५ संशोधक सहभागी होतील. एप्रिल महिन्यात संशोधन पद्धतीवर कार्यशाळा आहे. वाचकांना अत्यल्प दरात पुस्तके देण्यासाठी प्रकाशन संस्था सुरू करणार आहोत.
>
> - डॉ. संजय पाईकराव, सचिव, मूर्ती व शिल्प संशोधन संस्था

### संस्थेच्या कार्याचा विस्तार

मूर्ती व शिल्प संशोधन संस्थेच्या माध्यमातून प्राचीन वारसा जनजागृतीचे काम सुरू आहे. हिंदू, बौद्ध व जैन स्थापत्याचा अभ्यास, पुरातत्त्वीय स्थळांचा शोध घेणे, परिषदेमार्फत दस्ताऐवजीकरण करणे आणि पुरातत्त्व खात्याच्या परवानगीने उत्खनन करणे व पुरावशेषांचे जतन करण्याचे उद्दिष्ट आहे. वार्षिक चर्चासत्र, अभ्यास सहल, परिसंवाद, कार्यशाळा यातून संशोधकांना प्रोत्साहीत करणे आणि जोडून घेण्याचे काम संस्था करीत आहे. संशोधकीय शिस्तीसाठी संशोधन पत्रिका प्रकाशित करण्याचा प्रयत्न आहे. प्राचीन वारशाबद्दल जागरुकता वाढल्यास अभ्यासाला गती येईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

Shivaji College Library * Kannad *

17.02.2022

# मूर्ती-शिल्प संशोधन संस्थेचे दुसरे राष्ट्रीय अधिवेशन

औरंगाबाद, (सांजवार्ता ब्युरो): भारतात एकूण ६४ कला असून त्यातील मूर्ती व शिल्पांच्या अभ्यासासाठी स्थापन करण्यात आलेल्या मूर्ती-व शिल्प संशोधन संस्थेचे दुसरे राष्ट्रीय अधिवेशन कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात मार्च महिन्याच्या शेवटी होणार आहे.

या दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनात एक परिसंवाद, चार शोधनिबंधांचे वाचन होणार आहे. त्यात प्रतिक विचार, मुर्तीकलेचा उगम, मूर्तीपूजेचा उध्दव व विकास, मूर्तीविज्ञान, मूर्तीविज्ञानाचे वाङ्मयीन स्त्रोत, मूर्ती घडवण्याची माध्यमे, प्रमाणपध्दती वैशिष्ट्ये, मूर्तीची वाहने, आयुधे, स्थान, आसन, मुद्रा, वस्त्र, अलंकार, विविध कालखंडातील, विविध राजवटीतील मूर्तीकलेची वैशिष्ट्ये यांचा समावेश आहे. मूर्तिशास्त्र व स्थापत्यकला यांचे आजच्या काळात असलेले महत्त्व त्यांचा अभ्यास करतांना अभ्यासाच्या पारंपारिक पध्दतीसोबत आधुनिकतेची सांगड त्यांच्या जतन व संवर्धनाची आवश्यकता स्वरूप व त्याकरिताच्या उपाययोजना या बाबींचाही समावेश असेल याचा संशोधकाने विचार करावा. या अधिवेशनासाठी संशोधनपर लेख जरूर पाठवावे. ठरलेले निकष पूर्ण करणारे व प्रकाशन शुल्क भरलेल्यांचेच शोधनिबंध हे प्रकाशित केले जातील असे आवाहन परिषदेचे अध्यक्ष डॉ झाकीर पठाण व सचिव डॉ संजय पाईकराव यांनी केले आहे.

दैनिक दिव्य मराठी

दिव्य मराठी. मंगळवार, २२ फेब्रुवारी २०२२




छ.शिवाजी महाविद्यालयात बोलताना डॉ.शिवाजी हुसे,व्यासपीठावर प्राचार्य डॉ.विजय भोसले,डॉ.भाऊसाहेब मगर आणि मान्यवर

## छत्रपती शिवरायांचे शेतकरीविषयक धोरण आजही उपयुक्त : प्रा. हुसे

प्रतिनिधी | कन्नड

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात गावगाडा स्वयंपूर्ण होता. शिवरायांनी सामान्य जनतेची खूप काळजी घेतली. मुख्यत: शेती आधारित समाज असल्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये, लाकूडफाटासुद्धा मोबदला देऊन घ्यावा, असे आदेश छत्रपती शिवाजी महाराजांनी दिले. छत्रपती शिवरायांचे शेतीविषयक धोरण आजही उपयुक्त आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी व व्याख्याते डॉ. शिवाजी हुसे यांनी केले.

शिवाजी महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य नानाभाऊ मगरे, प्रा. आर. जी. लहाने यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. हुसे म्हणाले की, दुष्काळात छत्रपती शिवाजी महाराज यांनी शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी मोफत बी-बियाणे पुरवले. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शिवाजी महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापित करून अठरापगड समाजातील नागरिकांना पदे, मान सन्मान दिला. प्राचार्य डॉ. भोसले म्हणाले की, शिवरायांनी विचार स्वातंत्र्य दिले. माणसं निवडण्याची पारख त्यांच्याकडे होती. प्रा. लहाने यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. झाडे यांनी केले. डॉ. भानुसे यांनी आभार मानले.

सकाळ
औरंगाबाद, मंगळवार, २२ फेब्रुवारी २०२२

## शिवरायांचे शेतकरी विषयक धोरण आजही उपयुक्त : डॉ. शिवाजी हुसे

**कन्नड :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात गावगाडा स्वयंपूर्ण होता. शिवरायांनी सामान्य जनतेची खूप काळजी घेतली. मुख्यत: शेती आधारित समाज असल्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले.

शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये, लाकूडफाटा सुद्धा मोबदला देवून घ्यावा, असे आदेश महाराजांनी दिले. छत्रपती शिवरायांचे शेतीविषयक धोरण आजही उपयुक्त आहे, असे प्रतिपादन कवी व व्याख्याते डॉ. शिवाजी हुसे यांनी केले.

येथील शिवाजी महाविद्यालयात शिवजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य नानाभाऊ मगरे, प्रा. आर.जी. लहाने यांची उपस्थिती होती. डॉ. हुसे म्हणाले की, दुष्काळात छत्रपती शिवरायांनी शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी मोफत बी. बियाणे पुरवले.

सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शिवाजी महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापित करून अठरापगड समाजातील नागरिकांना पदे, मान सन्मान दिला. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. आर.जी. लहाने, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे आदी उपस्थित होते.

Shivaji College Library Kannad

Shivaji College Library * Kannad *

तरुण भारत
www.tarunbharat.org
सोमवार, दि. २८ फेब्रुवारी २०२२

# डॉ. अनिल क्षीरसागर यांच्या निवडक आयुर्वेदिक वनस्पती व तिचे गुणधर्म या पुस्तकाचे प्रकाशन

**तभा, वृत्तसेवा**
**कन्नड, दि.२७ फेब्रुवारी –**
येथील शिवाजी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख, समाजभूषण प्रा.डॉ.अनिल क्षीरसागर सर यांच्या निवडक आयुर्वेदिक वनस्पती व तिचे गुणधर्म या पुस्तकाचे प्रकाशन श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंहजी पवार (बापूसाहेब) यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले.



सदरील पुसतकामध्ये विविध आर्युवेदीक वनस्पतींची माहिती व औषधी गुणधर्म याचा उल्लेख केला आहे प्रामुख्याने अश्वगंधा, कळलावी, ब्राम्ही, सफेद मुसळी, तरवट, गुळवेल, शतावरी, शिक्का इत्यादी वनस्पतींचा समावेश आहे. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मा.अशोकराव अण्णा आहेर, प्रोफेसर डॉ.सुरेश गायकवाड, प्राचार्य डॉ.विजय भोसले, प्रोफेसर डॉ.अनिल शंकरवार, उपप्राचार्य डॉ.बी.के.मगर, प्रोफेसर डॉ.बी.के.मगर, विलास पवार, डॉ.डी.टी.साखरे, डॉ.अतिश मेहेत्रे यांची उपस्थिती होते.

Shivaji College Library
Kannad

दैनिक दखनी स्वराज्य
सामान्यांच्या न्यायहक्कासाठी

मंगळवार दि.१ मार्च २०२२ संपादक : संतोष श्रीमंतराव तांबे 9850017175

# जो पर्यंत माय आहे तो पर्यंत मराठी भाषेला मरण नाही –डॉ.प्रतिभा अहिरे

दै.दखनी स्वराज्य/वृत्तसंस्था

-कन्नड : मराठी भाषेला फार मोठी समृद्ध परंपरा आहे. सातत्याने विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन होत असते. आपल्या साहित्य लेखणातून आजपर्यंत संतापासून ते नव्या लेखकांनी विपूल प्रमाणात ग्रंथ निर्मिती केली आहे . मराठी भाषेची चिंता करण्याची गरज नाही कारण जोपर्यंत माय आहे तो पर्यंत मराठी भाषेला मरण नाही असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य तथा प्रख्यात कवयित्री व विचारवंत प्रोफेसर डॉ. प्रतिभा अहिरे यांनी केले.(ता. २८ ) येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिना निमित्त मराठी विभाग, व ग्रंथालय विभागातर्फे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अहिरे उपस्थित होत्या. सामान्य माणसाला मराठी ची चिंता नाही ती बध्दिजिवी वर्गाला अधिक आहे. सामान्य , कष्टकरी माणसांनी मराठी भाषा जिवंत ठेवली असे विचार त्यांनी मांडले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर होते. मंचावर प्रा. व्ही.के देशमुख, मराठी विभाग प्रमुख




डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. प्रतिभा अहिरे यांनी सविस्तर मार्गदर्शन करून माय ही स्वरचित कविता सादर केली. प्रारंभी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. यावेळी प्रा. व्ही. के. देशमुख यांनीही मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात डॉ. भाऊ साहेब मगर म्हणाले की, मराठीचे काय होणार याची चिंता करण्या पेक्षा मायबापांची चिंता करा. मराठी कधिही नामशेष होणार नाही असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले तर आभार प्रा. संतोष देशमुख यांनी मानले. यावेळी ग्रंथालयीन कर्मचारी अशोक काळे व अजय पवार यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. उदय डोंगरे, डॉ. अलका गडकरी, डॉ. सुनील गोरडे, डॉ. प्रकाश महाजन, डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. के.एल. भानुसे, डॉ. रणजित पवार, डॉ. मीना वडगुळे, प्रा. स्वाती भोसले यांच्या सह विद्यार्थी उपस्थिती होते.

देशोन्नती -02-03/2022

Shivaji College Library
Kannad

# जोपर्यंत माय आहे तोपर्यंत मराठी भाषेला मरण नाही - डॉ.प्रतिभा अहिरे



**कन्नड :** मराठी भाषेला फार मोठी समृद्ध परंपरा आहे. सातत्याने विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन होत असते. आपल्या साहित्य लेखणातून आजपर्यंत संतापासून ते नव्या लेखकांनी विपूल प्रमाणात ग्रंथ निर्मिती केली आहे. मराठी भाषेची चिंता करण्याची गरज नाही कारण जोपर्यंत माय आहे, तोपर्यंत मराठी भाषेला मरण नाही, असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य तथा प्रख्यात कवयित्री व विचारवंत प्रा.डॉ.प्रतिमा अहिरे यांनी केले. सोमवारी (ता.२८) येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिना निमित्त मराठी विभाग व ग्रंथालय विभागातर्फे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख वक्ते म्हणून डॉ.अहिरे उपस्थित होत्या. सामान्य माणसाला मराठीची चिंता नाही ती बुध्दिजिवी वर्गाला अधिक आहे. सामान्य, कष्टकरी माणसांनी मराठी भाषा जिवंत ठेवली असे विचार त्यांनी मांडले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर होते. मंचावर प्रा.व्ही.के.देशमुख, मराठी विभाग प्रमुख डॉ.शिवाजी हुसे, डॉ.रामचंद्र झाडे, ग्रंथपाल प्रा.संतोष देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ.प्रतिमा अहिरे यांनी सविस्तर मार्गदर्शन करून माय ही स्वरचित कविता सादर केली. प्रारंभी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ.शिवाजी हुसे यांनी केले. यावेळी प्रा.व्ही.के.देशमुख यांनीही मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.रामचंद्र झाडे यांनी केले. तर आभार प्रा.संतोष देशमुख यांनी मानले.(ता.प्र.)

Shivaji College Library * Kannad *

सकाळ
औरंगाबाद, गुरुवार,
३ मार्च २०२२

# शिवाजी महाविद्यालयात व्याख्यानाची सांगता

कन्नड, ता.२ (बातमीदार) : मराठी भाषेला फार मोठी समृद्ध परंपरा आहे. आपल्या साहित्य लेखणातून आजपर्यंत संतापासून ते नव्या लेखकांनी विपुल प्रमाणात ग्रंथ निर्मिती केली आहे. मराठी भाषेची चिंता करण्याची गरज नाही, कारण जोपर्यंत माय आहे, तोपर्यंत मराठी भाषेला मरण नाही, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य तथा प्रख्यात कवयित्री व विचारवंत प्रोफेसर डॉ. प्रतिभा अहिरे यांनी (ता.२८) शिवाजी महाविद्यालयात केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी विभाग व ग्रंथालय विभागातर्फे विशेष आयोजित कार्यक्रम त्या बोलत होत्या. यावेळी अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर होते. मंचावर प्रा. व्ही. के. देशमुख, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. यावेळी प्रा. व्ही. के. देशमुख यांनीही मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात डॉ.भाऊसाहेब मगर यांनी केला. सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले तर आभार प्रा. संतोष देशमुख यांनी मानले. याप्रसंगी अशोक काळे, अजय पवार यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ.उदय डोंगरे, डॉ. अलका गडकरी, डॉ. सुनील गोरडे, डॉ. प्रकाश महाजन, डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ.के. एल. भानुसे, डॉ. रणजित पवार, डॉ. मीना वडगुळे, प्रा. स्वाती देशमुख यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



कन्नड : कार्यक्रमाप्रसंगी प्रा.प्रतिभा अहिरे, डॉ. भाऊसाहेब मगर, डॉ. शिवाजी हुसे, व्ही. के. देशमुख, प्रा.संतोष देशमुख आदी.

Shivaji College Library Kannad

सकाळ » TODAY
औरंगाबाद, गुरुवार, १० मार्च २०२२ ३

# सोशल मीडियामुळे स्त्रियांच्या शोषणात वाढ

## संगीता निकम यांचे प्रतिपादन : महिलांना ठरू शकते घातक, कुटुंब संस्थाही अस्थिर

**कन्नड ता. ९ (बातमीदार) हुंडा, संशय या पारंपरिक स्त्री शोषणात आता सोशल मिडीयाच्या अविवेकी वापराने भर पडली आहे. सतत सोशल मिडीयावर अपडेट राहणे महिलांसाठी घातक ठरत आहे, असे प्रतिपादन नाशिक पोलिस अकादमीच्या सहाय्यक आयुक्त संगीता निकम यांनी शिवाजी महाविद्यालयात (ता.८) केले.**

महाराष्ट्र राज्य तंत्र व उच्च शिक्षण विभाग व शिवाजी महाविद्यालय अस्मिता फोरम संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, आर्थिक सुबत्ता वाढलेल्या कुटुंबातही महिलांचे शोषण होते. मोठ्या पदावर काम करणाऱ्या महिलांचे बँकपासबुक पतीकडे असते.

सोशल मिडीयावर सतत नवनवे फोटो टाकणे, अपडेट राहणे महिलांसाठी घातक ठरत आहेत. यातून मोठ्या प्रमाणात गुन्हे होत आहे. कुटुंबं अस्थिर होत आहेत. यासाठी स्त्री-पुरुष समतेची शिकवण कुटुंबातून, शाळा, महाविद्यालयातून देण्याची गरज आहे. सोशल मिडीयाचा वापर जबाबदारीने करा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रास्ताविक प्रा. प्रतिभा अहिरे यांनी केले. या कार्यक्रमात राष्ट्रीय महामार्ग वाहतूक विभागाच्या सहाय्यक पोलिस निरिक्षक कल्पना राठोड, तन्वी जालनापूरकर, आर्किटेक्ट निकिता अग्रवाल, महिला बचतगट नेत्या हिराबाई वायकोस, पोलिस पाटील निर्मला पवार, अनिता लाडे, छाया झाने, सायराबी शेख, विद्या घायतिलक, अश्विनी शिंदे, डॉ. स्वाती भोसले, मुख्याध्यापक ए. पी. चव्हाण, अधिक्षक संतोष चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य बी. के. मगर, प्रा. सीमा काशीद, प्रा.अलका गडकरी आदींची उपस्थिती होती. यशस्वितेसाठी प्रशांत जालनापूरकर, प्रा.शैलेंद्र कोल्हे, प्रा. संजय भालेराव, डॉ. प्रकाश खेत्री, किरण राठोड, प्रा.शिवाजी हुसे, प्रा. रामचंद्र झाडे, प्रा.डी. डब्ल्यू. शिंदे आदींसह सूत्रसंचालन प्रा.मीना वडगुळे यांनी केले. आभार डॉ. अलका गडकरी यांनी मानले.




**कन्नड : शिवाजी महाविद्यालयातील व्याख्यानात बोलताना संगीता निकम. व्यासपीठावर विजय भोसले, प्रतिभा अहिरे, बी. के. मगर, स्वाती भोसले, अलका गडकरी, मीना वडगुळे, सीमा काशीद आदी.**

Shivaji College Library
* Kannad *

लोकमत समाचार
औरंगाबाद, शुक्रवार 11 मार्च 2022

## सोशल मीडिया पर लगातार बने रहना खतरनाक

कन्नड़ में आयोजित कार्यक्रम में नासिक पुलिस अकादमी की सहायक आयुक्त संगीता निकम ने कहा कि सोशल मीडिया पर लगातार बने रहना महिलाओं के लिए खतरनाक हो सकता है. महाराष्ट्र तकनीकी और उच्च्य शिक्षा विभाग तथा शिवाजी कॉलेज के अस्मिता फोरम के संयुक्त प्रयासों से अंतर्राष्ट्रीय महिला दिवस के अवसर पर आयोजित कार्यक्रम में वह अपनी बात रख रही थीं. प्रबंधन परिषद की सदस्य प्रतिभा अहिरे ने कहा कि व्यवस्था तब तक नहीं बदलेगी, जब तक पुरुष दृष्टिकोण समतावादी न हो. कार्यक्रम में राष्ट्रीय महामार्ग यातायात विभाग की सहायक पुलिस निरीक्षक कल्पना राठौड़, तन्वी जालनापुरकर, आर्किटेक्ट निकिता अग्रवाल, महिला बचत गुट की नेता हीराबाई वायकोस, पुलिस पाटील निर्मला पवार, अनीता लाड़े, छाया झाने, सायराबी शेख, विद्या घायतिलक, अश्विनी शिंदे, डॉ स्वाति भोसले, मुख्याध्यापक एपी चव्हाण, अधीक्षक संतोष चव्हाण को सम्मानित किया गया. संचालन मीना बड़गुले ने किया.




अंतिम चित्र कन्नड़ के शिवाजी कॉलेज

90

Shivaji College Library * Kannad *

सकाळ
औरंगाबाद, गुरुवार,
१७ मार्च २०२२



कन्नड : हिवरखेडा-गौताळा येथील शिबिरात बोलताना प्राचार्य विजय भोसले. सोबत सरपंच सुमित्रा जाधव, भाऊसाहेब मगर, अशोक भोसीकर, प्रकाश महाजन आदी.

## युवक, लोकसहभागातून गावाचा विकास शक्य

कन्नड : महाविद्यालयाने महाविद्यालयाच्या बाहेर असलेल्या जनमाणसांशी जोडून घ्यावे, त्यांचे प्रश्न समजून घ्यावेत. महाविद्यालयीन युवक व लोकसहभागातून गावाचा विकास शक्य आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी (ता.१६) केले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवशीय विशेष शिबीराचे उदघाटन हिवरखेडा गौताळा येथे घेण्यात येत आहे. याप्रसंगी ते बोलत होते. या शिबिराचे उदघाटन सरपंच श्रीमती सुमित्रा जाधव यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर, ग्रामसेविका श्रीमती बनगे, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक मनगटे, देशमुख, ज्ञानेश्वर दाभाडे, भारत लवांदे, शांताराम वैष्णव यांची उपस्थिती होती.प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अशोक भोसीकर यांनी केले, सूत्रसंचालन डॉ.मीना वडगुळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.संतोष देशमुख यांनी केले. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. बी. जी. देशमुख, डॉ. अलका गडकरी, रवी भागवत मोठ्या संख्येने स्वयंसेवक विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

दैनिक मराठवाडा साथी
औरंगाबाद, शुक्रवार १८.०३.२०२२
०८

Shivaji College Library * Kannad *

९२

राष्ट्रीय सेवा दल सात दिवसीय शिबिर उत्साहात, विद्यार्थ्यांची मोठ्या सख्येने उपस्थिती

# युवक आणि लोकसहभागातून गावाचा विकास शक्य - प्राचार्य भोसले

मराठवाडा साथी न्यूज

कन्नड। महाविद्यालयीन युवक आणि लोकसहभागातून गावाचा सर्वांगीन विकास शक्य असल्याचे प्रतिपाद प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, शिवाजी महाविद्यालय कन्नड तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औरंगाबाद व ग्रामपंचायत कार्यालय हिवरखेडा गौताळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन गुरुवारी सरपंच सुमित्रा जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.



■ हिवरखेडा येथे सात दिवसीय विशेष शिबिराचे उद्घाटन सरपंच सुमित्रा जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजय भोसले होते. या समारंभास उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर, ग्रामसेविका श्रीमती बनगे, शिक्षक मनगटे , ज्ञानेश्वर दाभाडे, भारत लवांदे, शांताराम वैष्णव यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.विजय भोसले म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक खुले व्यासपीठ असून युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीचे मूल्य दृढ करण्याकरिता महत्त्वाची भूमिका बजावते. गाव स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी होण्यासाठी युवक महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात व सशक्त राष्ट्र निर्मितीसाठी हे महत्त्वाचे आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अशोक भोसीकर यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. मीना वडगुळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. संतोष देशमुख यांनी केले. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. बी. जी. देशमुख, डॉ. अलका गडकरी, सेवक रवी भागवत यांच्यासह मोठ्या संख्येने स्वयंसेवक विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

Shivaji College Library Kannad

93

सकाळ » TODAY

औरंगाबाद, बुधवार, २३ मार्च २०२२ ४

# स्त्रियांची न्यूनगंडातून मुक्तता व्हावी

## प्रा. प्रतिभा अहिरे : हिवरखेड्यातील 'रासेयो' शिबिरात मार्गदर्शन

**कन्नड, ता. २२ (बातमीदार) : स्त्री-पुरुष समता अस्तित्वात आल्याशिवाय देश महासत्ता होणार नाही. त्यासाठी स्त्रियांची न्यूनगंडातून मुक्तता झाली पाहिजे, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रतिभा अहिरे यांनी व्यक्त केले.**

शिवाजी महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या अंतर्गत हिवरखेडा येथे घेण्यात आलेल्या शिबिरात 'स्त्री मुक्ती चळवळ' या विषयावर प्रा. अहिरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्या म्हणाल्या की, ''स्त्रीवादी विचारवंत सिमॉन म्हणाल्या की, स्त्री ही जन्मतः नसून ती समाजाकडून घडवली जाते. याचाच अर्थ पुरुष देखील घडवला जातो. 'मर्द को दर्द नहीं होता', पुरुष रडला तर काय मुलींसारखा रडतो? अशा वाक्यातून स्त्री-पुरुषांची जडणघडण होते. स्त्रियांना मिळालेलं दुय्यमत्व नष्ट करायचे असेल तर पुरुषांनी त्यांच्या अहंगडातून आणि स्त्रियांनी त्यांच्या न्यूनगंडातून बाहेर पडणे गरजेचे आहे''.

यावेळी चित्रकार व पत्रकार राजानंद सुरडकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेकांसोबत चित्रकला व पत्रकारितेशी संबंधित विविध प्रश्नांची उत्तरे देत संवाद साधला. प्रा. सुनील गोरडे यांनी 'कृषी विकासात तरुणांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन केले. व्यासपीठावर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अशोक भोसीकर, प्रा. प्रकाश महाजन, प्रा. अल्का गडकरी, प्रा. संतोष देशमुख आदींची उपस्थिती होती.

दरम्यान, प्रतिभा अहिरे यांनी कविताही सादर केल्या. तसेच यावेळी चर्चासत्रही झाले. अक्षदा गावंडे हिने सूत्रसंचालन केले. गोकूळ माळी यांनी आभार मानले.



हिवरखेडा : 'रासेयो' शिबिरात प्रा. प्रतिभा अहिरे यांचे व्याख्यान झाले. यावेळी प्रा. सुनील गोराडे, अशोक भोसीकर, अलका गडकरी, प्रकाश महाजन.

Shivaji College Library * Kannad *

आदर्श गावकरी
www.adarshgavkari.com
बुधवार, दि. २३ मार्च २०२२

# स्त्री-पुरुष समता अस्तित्वात आल्याशिवाय देश महासत्ता होणार नाही : प्रा.प्रतिभा अहिरे

कन्नड/प्रतिनिधी



स्त्री-पुरुष समता अस्तित्वात आल्याशिवाय देश महासत्ता होणार नाही. त्यासाठी पुरुषांची अहंम गंडातून, स्त्रियांची न्यूनगंडातून मुक्तता झाली पाहिजे. असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रतिभा अहिरे यांनी हिवरखेडा येथे व्यक्त केले.

शिवाजी महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत हिवरखेडा येथे घेण्यात आलेल्या शिबीरात कवियत्री प्रा. अहिरे यांचे 'स्त्री मुक्ती चळवळ' या विषय वर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. यावेळी प्रसिध्द चित्रकार व पत्रकार .राजानंद सुरडकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेकासोबत चित्रकला व पत्रकारितेशी संबंधित विविध प्रश्नांची उत्तरे देत संवाद साधला. प्रा. सुनील गोरडे यांनी 'कृषी विकासात तरुणांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयिन तरुणांनी कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत, कृषी अर्थशास्त्र लक्षात घेऊन शेती करणे काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी मंचावर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अशोक भोसीकर, प्रा. प्रकाश महाजन, प्रा. अल्का गडकरी, प्रा. संतोष देशमुख आदींची उपस्थिती,होती. याप्रसंगी झालेल्या खुल्या चर्चासत्रात गणेश हिरे, प्रतिभा गायकवाड, अजय शिंदे ,आस्मा शेख, अश्विनी गाडेकर, अमित चव्हाण, पल्लवी काळे, अंजली दमई, गणेश शिरे,आदेश राठोड, वैभव नागरे, विकास निकम, कुणाल केवट, सावन पवार, सागर घुगे, प्रफुल्ल जाधव, प्रकाश कातोरे, विशाल गायकवाड, कार्तिक कातवारे, गणेश राठोड, ज्ञानेश्वर राठोड आदींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षदा गावंडे हिने केले तर आभार प्रदर्शन गोकुळ माळी यांनी मानले.

94

Shivaji College Library Kannad

दैनिक
मराठवाडा साथी
औरंगाबाद, गुरुवार
२४.०३.२०२२
०८



■ हिवरखेडा येथे रासेयोच्या शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना डिवायएसपी आघाव.

# रासेयो अनुभव संपूर्ण आयुष्यासाठी उपयोगी : डीवायएसपी मुकुंद आघाव

मराठवाडा साथी न्यूज

कन्नड। तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना यांच्या उपक्रमाद्वारे होत असते. हाच अनूभव आयुष्यासाठी उपयोगी पडत असल्याचे प्रतिपादन डीवायएसपी मुकुंद आघाव यांनी केले.

शिवाजी महाविद्यालय कन्नड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औरंगाबाद व ग्रामपंचायत हिवरखेडा गौताळा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सात दिवसीय विशेष शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. दि.१६ ते २२ मार्च या दरम्यान हिवरखेडा गौताळा येथे करण्यात आले होते.स्वयंसेवकांनी इथे शिबिरात राहून मिळालेल्या ज्ञानाचा अनुभवाचा फायदा स्वतःच्या गावाच्या विकासासाठी करावा असेही ते म्हणाले.हिवरखेडा गावच्या सरपंच सुमित्रा जाधव यांनी राष्ट्रीय सेवा दल स्वयंसेवकांनी गावात जे विविध उपक्रम,अभियान राबविले या बद्दल आभार मानले.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.व्ही एन भोसले यांनी केला. राष्ट्रीय सेवा स्वयंसेवकतर्फे प्रतिनिधी सावन पवार व अंजली दमानिया तर भारत लवांदे, ज्ञानेश्वर दाभाडे यांनी मनोगत व्यक्त केले. स्वयंसेवक सावंत पवार, प्रफुल जाधव, गौतम सूर्यवंशी, योगेश चव्हाण, पूजा गायकवाड, अंजली दमनिया यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. संतोष देशमुख यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ.मीना वडुळे यांनी केले.

लोकमत
गुरुवार २४.३.२०२२

# एनएसएसचा अनुभव; आयुष्यभराची शिदोरी

## उपविभागीय पोलीस अधिकारी आघाव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कन्नड :** तरुणांमध्ये सामाजिक बांधीलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे काम महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेतील उपक्रमाद्वारे होत असते. शिवाजी महाविद्यालयातील रा. से. यो. युनिट ग्रामीण भागात जात प्रश्नांची सोडवणूक करते, हीच खरी राष्ट्रसेवा आहे. स्वयंसेवकांना एनएसएसच्या शिबिरात मिळालेला अनुभव म्हणजे आयुष्यभराची शिदोरी आहे, असे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव यांनी केले.

शिवाजी महाविद्यालय, डॉ. बा. आं. म. विद्यापीठ व ग्रामपंचायत हिवरखेडा गौताळा यांच्या संयुक्त विद्यमाने, सात दिवसीय विशेष शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाधिकारी प्रा. अशोक भोसीकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश महाजन यांनी अहवाल वाचन केले. सरपंच सुमित्रा जाधव यांनी स्वयंसेवकांनी गावात राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले यांनी केला. स्वयंसेवक प्रतिनिधी सावन पवार व अंजली दमनिया व ग्रामस्थ भारत लवांदे, ज्ञानेश्वर दाभाडे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष देशमुख यांनी, तर मीना वडगुळे यांनी आभार व्यक्त केले.

Shivaji College Library
Kannad

पुढारी औरंगाबाद रविवार, २७ मार्च २०२२

# आग्या मोहोळाच्या हल्ल्यांत २१ प्राध्यापक जखमी

## कन्नड तालुक्यातील पितळखोरा येथील घटना : इतिहास संशोधनासाठी केला होता दौरा आयोजित

**कन्नड, पुढारी वृत्तसेवा :** तालुक्यातील पितळखोरा येथे संशोधन करण्यासाठी गेलेल्या प्राध्यापकांच्या समूहावर आग्या मोहोळाच्या माश्यांनी हल्ला केला. या घटनेत २१ प्राध्यापक जखमी झाले. यातील दहा जणांची प्रकृती गंभीर आहे. ही घटना शनिवारी दुपारी १ वाजता घडली. जखमींवर कन्नड आणि औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या संदर्भात राष्ट्रीय परिषदेचे संयोजक डॉ. जगदीश भेलोंडे दिलेल्या माहितीनुसार कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय इतिहास परिषदेच्या वतीने तालुक्यातील पितळखोरा येथे डॉ. संजय पाईकराव यांच्या नेतृत्वाखाली हेरिटेज वॉकनिमित्त २१ प्राध्यापक तालुक्यातील पितळखोरा या ठिकाणी इतिहास या विषयासाठी संशोधन करण्यासाठी गेले होते.

शनिवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास या प्राध्यापक समूहावर आग्या मोहोळाच्या माश्यांनी हल्ला केला. यात सर्व जण जखमी झाले. यातील दहा जणांची प्रकृती गंभीर आहे.

या घटनेची माहिती मिळताच प्राचार्य विजय भोसले व त्यांच्या सहकारी प्राध्यापकांनी पितळखोरा येथे रुग्णवाहिका आणली. नंतर डॉक्टरांनी जखमींवर जागेवरच प्राथमिक उपचार केले. डॉ. सीताराम जाधव, सदाशिव पाटील या वैद्यकीय टीमने लेण्यांच्या कुंडात मधमाश्यांच्या तावडीत सापडून गंभीर जखमी होऊन कोसळलेल्या प्राध्यापकांवर रुग्णवाहिकेमधील आयसीयूमध्ये उपचार केला. नंतर दहा गंभीर जखमींना औरंगाबादच्या घाटीत हलविण्यात आले.

चारजण डॉ. जाधव यांच्या रुग्णालयात उपचार घेत आहेत. सर्वच जखमींची प्रकृती सुधारत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

दरम्यान, आग्या मोहोळाच्या माश्यांनी हल्ला केल्यानंतर पितळखोऱ्यातील लेण्यांमधील दरीत अडकलेल्या प्राध्यापकांना दरीवर काढण्यासाठी गावातील दोन आदिवासी तरुणांसह अनेक ग्रामस्थ या ठिकाणी आले. ग्रामस्थांनी कसरत करून या प्राध्यापकांना दरीवर काढून रुग्णवाहिकेत ठेवले. या कामगिरीबद्दल ग्रामस्थांचे प्राध्यापकांनी आभार मानले.

### जखमी झालेले प्राध्यापक

संदेश कांबळे, संजीवनी मांदळे (रा. औरंगाबाद), देविदास गलसिंग राठोड (रा. आबा तांडा), हरी रामचंद्र थोरवत, अतुल मुरलीधर भोसेकर (दोघे रा. नाशिक), जगदीश गोपाल असुदे, माधुरी जगदीश असूदे (रा. कर्नाटक), सूरज रतन जगताप (रा. नवी मुंबई), डॉ. किरण प्रकाश काळे, माया माशाळकर, डॉ. धरमपाल माशाळकर (रा. सोलापूर), नीता ओमप्रकाश नायक (रा. गोवा), वसुधा देशमुख (रा. डोंबिवली), सलीम खान (रा. मुंबई), डॉ. विजयकुमार भोले (रा. उस्मानाबाद), डॉ. अनिता शिंदे, हर्ष विजय जावळे (दोघे रा. बीड), डॉ. संजय हवालदार (रा. इंदौर), शरदचंद्र जैन (रा. नांदेड), अरविंद आचार्य (रा. तामिळनाडू) अशी जखमी प्राध्यापकांची नावे आहेत.



कन्नड : येथील जाधव हॉस्पिटलमध्ये प्राध्यापकावर उपचार करताना डॉ. सीताराम जाधव.

Kannad * Shivaji College Library

पुण्य नगरी

शनिवार, २६ मार्च २०२२

# रासेयो शिबिरातील अनुभवाची शिदोरी जीवनभर उपयोगी –आघाव

**कन्नड तालुका :** तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव, सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून होते. रासेयोतर्फे आयोजित शिबिरांतून मिळणारी अनुभवाची शिदोरी विद्यार्थ्यांना पुढे जीवनभर उपयोगी पडते असे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव यांनी केले. शिवाजी महाविद्यालय कन्नड , डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औरंगाबाद आणि हिवरखेडा-गौताळा ग्रामपंचायतच्या संयुक्त विद्यमाने हिवरखेडा-गौताळा येथे आयोजित सात दिवशीय रासेयो शिबिराचा समारोप २२ मार्च रोजी झाला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आघाव बोलत होते.पुढे ते म्हणाले, शिवाजी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा दल युनिट ग्रामीण भागात येऊन जमीन पातळीवरील प्रश्नांची सोडवणूक करते ही खरी राष्ट्रसेवा आहे. स्वयंसेवकांनी शिबिरात राहून मिळालेल्या ज्ञानाचा, अनुभवाचा उपयोग स्वतःच्या गावाच्या विकासासाठी करावा. सरपंच सुमित्रा जाधव यांनी राष्ट्रीय सेवा दल स्वयंसेवकांनी गावात राबविलेल्या उपक्रमांबद्दल आभार मानले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.व्ही एन भोसले म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना हे व्यक्तिमत्त्व विकासाचे खुले व्यासपीठ आहे.

सकाळ
औरंगाबाद, रविवार, २७ मार्च २०२२ ३

Shivaji College Library Kannad

# पितळखोरा लेणीत संशोधकांवर मधमाश्यांचा हल्ला

## चाळीस जण जखमी : स्थानिक आदिवासी मदतीला धावले, जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू

**कन्नड ता.२६(बातमीदार) : येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित मूर्ती व शिल्प संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनाला आलेल्या अभ्यासकांनी पितळखोरा लेणीस (ता.कन्नड) भेट दिली असता आग्या मोहळाच्या मधमाश्यांनी संशोधकांवर हल्ला केल्याने चाळीस जण जखमी झाल्याची घटना शनिवारी (ता.२६) सकाळी नऊ वाजता घडली. यापैकी दहा जण गंभीर जखमी झाले असून त्यांना अधिक उपचारासाठी औरंगाबादेतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात मूर्ती व शिल्प परिषदेचे (ता.२५-२६मार्च) दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. या अधिवेशनाला देशभरातून लेणी संशोधक सहभागी झाले होते. हे सर्व संशोधक शनिवारी सकाळी ९ वाजता प्राचीन लेणी पितळखोरा येथे गेले असता अचानक आग्या मोहळाच्या मधमाशांनी हल्ला केला. यामुळे संशोधक सैरावैरा धावत सुटले. परंतु खोल दर्यांमुळे सुरक्षित ठिकाणी पोचणे अवघड झाले.

काहींनी दरीतील पाण्याच्या कुंडात उड्या मारल्या. तेथेही पाणी पुरेसे नसल्याने मधमाश्यांच्या हल्ल्यांपासून बचाव करता आला नाही.





**कन्नड : पितळखोरा लेणीत गंभीर जखमी झालेल्या शैलेश सावे यांना स्थानिक आदिवासींच्या मदतीने दरीतून वर काढण्यात आले. (दुसऱ्या छायाचित्रात) पितळखोरा लेणीत जखमी झालेल्या संशोधकावर कन्नड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे.**

मधमाश्यांनी चढविलेल्या हल्ल्यात प्रा. संजय पाईकराव, संदेश कांबळे, सुधाचंद्र जैन, सलीम खान, शैलेश सावे, अतुल भोसीकर, संजय हवालदार, अस्मिता हवालदार (रा. मध्यप्रदेश), जगदीश गोपाल असोदे, माधुरी आसोदे (रा.कर्नाटक), नीता नाईक हे गंभीर जखमी झाले आहेत. तसेच माया माशाळकर,, प्रा.धम्मपाल माशाळकर (रा. सोलापूर), प्रा. अरविंद आचार्य (रा.हैदराबाद), संजिवनी मादळे (रा.औरंगाबाद), रिझवान देशमुख, वसुधा देशमुख (रा.कल्याण), थोरवत श्रीहरी (रा. नाशिक), सूरज जगताप (मुंबई), रितेश वाघे, अक्षर कापसे, पृथ्वीराज धवड (सर्व रा.नागपूर), प्रा.माधुरी चौगुले, पुरातत्त्व विभागाचे रक्षक देविदास राठोड (रा.आंबा तांडा), डॉ. किरण काळे (रा. सोलापूर), नीता नायक (रा.गोवा),. वसुधा देशमुख (रा.डोंबिवली), डॉ. विजयकुमार भोजे (रा.उस्मानाबाद), डॉ.अनिता शिंदे (रा.बीड), हर्ष जावळे, डॉ. प्रकाश महाजन, अमोल कांबळे (रा. सोलापूर), बालाजी सिरसाठ (रा. सोलापूर), प्रा.जगदीश भेलोंडे, प्रा. कारभारी भानुसे, अरुण थोरात, (रा. कळंकी), स्वप्नील मगरे, सचिन खरात, सागर गायकवाड, डॉ. अनिता शिंदे आदींचा जखमींमध्ये समावेश आहे.

दरम्यान, शैलेश सावे हे तीन तास अत्यवस्थ अवस्थेत दरीत पडून होते. त्यांना प्रा.कारभारी भानुसे, साईनाथ काळे, केशव आघान, विजय चॉंदसिंग चव्हाण, सोमनाथ चव्हाण यांनी शर्थीचे प्रयत्न करून येथील आदिवासी यशोधावजी आघान, सोमनाथ उघडे, हरिदास गावंडे, केशव आघान, साईनाथ काळे यांच्या मदतीने टेंभा पेटवून संशोधकांना तेथून बाजूला आणले. सावे यांच्यावर घटनास्थळीच डॉ.सीताराम जाधव यांनी उपचार केल्याने अनर्थ टळला.

दरम्यान, जखमींना कन्नड ग्रामीण रुग्णालयात विशेष खाटांची सोय करण्यात आली. डॉ. प्रवीण पवार, डॉ. मनिषा गिते, डॉ. ऋतुजा थोरात, परिचारिका विजया साळवे, संध्या गवळी, पी. डी. राठोड, मधुकर मतसागर जाधव नर्सिंग होममध्ये डॉ. सीताराम जाधव, डॉ. रिझवान देशमुख, डॉ. सदाशिव पाटील, आकाश पवार आदींनी उपचार केले. ग्रामीण रुग्णालयात आमदार उदयसिंग राजपूत, शिवाजी महाविद्यालयाचे अध्यक्ष मानसिंह पवार, प्रदिप म्हैसेकर यांनी भेट देऊन जखमींची विचारपूस केली. यावेळी प्राचार्य विजय भोसले, डॉ. सीताराम जाधव, डॉ. मुकुंद सोमवंशी, डॉ. सदाशिव पाटील, सचिन गिरी, राज ठाकूर, प्रा.प्रतिभा अहिरे, डॉ. प्रकाश खेत्री, विजय शितोळे, अमोल शितोळे, सरपंच सखाराम भुतांबरे, देविदास राठोड आदींनीही मदत केली.

Shivaji College Library Kannad

आदर्श मराठ

www.adarshgavkari.com
रविवार, दि. २७ मार्च २०२२

आदर्श गावकरी



▪ पितळखोरा लेणी येथील घटना ▪ चाळीस जण जखमी ; दहा गंभीर ▪ गंभीर जखमी संशोधक दरीत तीन तास पडले अडकून
▪ राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठानच्या वैद्यकीय पथकाने दरीत जाऊन केले उपचार ▪ माश्यांनी डोळे, जिभ, कान काहीच सोडले नाही

# अभ्यासकांसह संशोधकांवर मधमाश्यांचा हल्ला

कन्नड / प्रतिनिधी

शिवाजी महाविद्यालयात आयोजित मुर्ती व शिल्प संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनाला आलेल्या अभ्यासकांनी शनिवारी (दि.२६) सकाळी नऊ वाजता पितळखोरा लेणीस भेट दिली. यावेळी आग्या मोहळाच्या मधमाश्यांनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला. यात चाळीस अभ्यासक जखमी झाले. त्यापैकी दहा जण गंभीर जखमी झाले असून त्यातील चौघांना औरंगाबाद येथे हलविण्यात आले आहे.

शिवाजी महाविद्यालयात मुर्ती व शिल्प परिषदेचे २५-२६ मार्च असे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. या अधिवेशनाला महाराष्ट्रातील मुंबई, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, कल्याण आदी शहरातून लेणी संशोधक सहभागी झाले होते. या संशोधकांचा अभ्यास दौरा आशिया खंडातील सर्वात प्राचीन लेणी पितळखोरा येथे आयोजित केला होता. यावेळी अचानक मधमाश्यांनी हल्ला चढवला. संशोधक या हल्याने सैरावैरा धावत सुटले.परंतु दुर्गम भाग व जंगलामुळे सुरक्षित ठिकाण मिळाले नाही. काहींनी दरीतील पाण्याच्या कुंडात उड्या मारल्या. संशोधकांनी कसातरी प्राचार्य विजय भोसले यांच्याशी संपर्क साधून मदत मागितली. त्यांनी सामाजिक कार्यकर्ते प्रा. प्रतिभा अहिरे, राजानंद सुरडकर यांच्याशी संपर्क साधला. यावरून ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. परदेशी, राजर्षी शाहू प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. सिताराम जाधव, डॉ. मुकुंद सोमवंशी, डॉ. सदाशिव पाटील, सचिन गिरी, राज ठाकूर, डॉ. प्रविण पवार यांच्याशी संपर्क साधला. ग्रामीण रुग्णालयात नेहमीप्रमाणे रूग्णवाहीका मिळण्यास अडचणी आल्या. डॉ. सिताराम जाधव, प्राचार्य विजय भोसले, प्रा. प्रतिभा अहिरे, डॉ. प्रकाश खेत्री, डॉ. मुकुंद सोमवंशी, राजानंद सुरडकर आदींनी घटनास्थळी धाव घेतली.



▸ देविदास गलसिंग राठोड यांनी सांगितले की, कांद्याचे पिक फुलोऱ्यात आहे. त्यातील रस पिल्यानंतर मधमाशा आक्रमक होतात. या दरम्यान पर्यटकांनी येथे येणे टाळावे.



▸ मधमाशानी केलेला हल्ला इतका भयानक होता की, जखमींच्या चेहऱ्यावर शंभर पेक्षा अधिक मधमाश्यांचे काटे रुतले होते. या माश्यांनी डोळे, जिभ, कान असे काहीच सोडले नाही. त्यामुळे जखमी अक्षरशः विव्हळत होते.

दरम्यान, या लेणीत आग्या मोहळाचे अनेक पोळे आहेत. मधमाश्यांनी चढवलेल्या हल्यात लेणी अभ्यासक प्रा. डॉ. संजय पाईकराव, संदेश कांबळे, सुधाचंद्र जैन, सलीम खान, शैलेश सावे, अतुल भोसीकर, संजय हवालदार, अस्मिता हवालदार रा.मध्यप्रदेश, जगदीश गोपाल असोदे, माधुरी जगदीश आसोदे रा.कर्नाटक, निता नाईक हे गंभीर जखमी झाले आहेत. तसेच माया माशाळकर, प्रा. धम्मपाल माशाळकर, रा. सोलापूर, प्रा.अरविंद आचार्य रा.हैद्राबाद, संजिवनी मादळे रा.औरंगाबाद, रिझवान देशमुख, वसुधा देशमुख रा.कल्याण, थोरवत श्रीहरी ,रा.नाशिक, सूरज रतन जगताप, मुंबई, रितेश वाघे,अक्षर कापसे, पृथ्वीराज धवड सर्व रा.नागपूर प्रा.माधुरी चौगुले, पुरातत्व विभागाचे रक्षक देविदास राठोड रा.आंबा तांडा, डॉ. किरण प्रकाश काळे, रा. सोलापूर, निता ओमप्रकाश नायक,रा. गोवा, वसुधा देशमुख रा.डोंबिवली, डॉ. विजय कुमार भोजे, रा. उस्मानाबाद, डॉ. अनिता शिंदे, रा.बीड, हर्ष विजय जावळे, डॉ. प्रकाश महाजन, अमोल कांबळे रा. सोलापूर, बालाजी सिरसाठ रा. सोलापूर, प्रा.जगदीश भेलोंडे, प्रा.कारभारी भानुसे, अरुण थोरात, रा.कळंकी, स्वप्नील मगरे, सचिन खरात, सागल गायकवाड, डॉ. अनिता शिंदे आदींचा जखमींमध्ये समावेश आहे.

▸ शैलेश सावे हे तब्बल तीन तास अत्यवस्थ अवस्थेत दरीत पडून होते. अधिक वजन असल्याने त्यांना दरीतून वर काढणे अवघड झाले. त्यासाठी प्रा. कारभारी भानुसे, साईनाथ विष्णू काळे, केशव आघान, विजय चाँदसिंग चव्हाण, सोमनाथ चव्हाण यांनी शर्थीचे प्रयत्न केले. दरम्यान शेकडो मधमाशा जखमी सावे यांच्या भोवती घोंगावत होत्या. त्यांच्या अंगावर कपडे टाकून मदतनिस परतले.अखेर डॉ. सिताराम जाधव यांनी स्थानिक आदिवासींची मदत मागितली. यशोधावजी आघान, रा. ठाकरवाडी, सोमनाथ रंगनाथ उघडे, रा.अंबाला, हरिदास गावंडे, केशव आघान, साईनाथ काळे यांनी टेंभा पेटवून रेस्क्यू करून त्यांना वर आणले. तरीही मधमाश्यांनी वरपर्यंत पिच्छा सोडला नाही. सावे यांच्यावर घटनास्थळीच डॉ. सिताराम जाधव यांनी उपचार केल्याने अनर्थ टळला.

दरम्यान, जखमींना कन्नड ग्रामीण रुग्णालयात विशेष बेडसची सोय करण्यात आली. डॉ. मनिषा गिते, डॉ. ऋतुजा थोरात, परिचारीका विजया साळवे, संध्या गवळी, पी. डी. राठोड, मधुकर मतसागर, डॉ. सिताराम जाधव, डॉ. रिझवान देशमुख, डॉ. सदाशिव पाटील, आकाश पवार आदींनी उपचार केले. ग्रामीण रुग्णालयात आमदार उदयसिंग राजपूत, शिवाजी महाविद्यालयाचे अध्यक्ष मानसिंह पवार, ईतिहासकार प्रदिप म्हैसेकर यांनी भेट देऊन जखमींना धीर दिला.

100

लोकमत
रविवार २७.३.२०२२

# अभ्यास दौऱ्यावर गेलेल्या संशोधकांवर आग्या मोहळाच्या माश्यांचा हल्ला !

## कन्नडमधील पितळखोरा लेणीतील प्रकार : २१ जण जखमी, उपचारानंतर प्रकृती बरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कन्नड :** अभ्यासासाठी गेलेल्या इतिहास, मूर्ती व शिल्प संशोधकांवर पितळ खोऱ्याच्या लेणीत आग्या मोहळाच्या मधमाश्यांनी हल्ला केल्याने २१ जण जखमी झाले. जखमींवर शहरातील ग्रामीण रुग्णालय आणि खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. सर्वांची प्रकृती सुधारल्याने सुखरूप सर्वजण आपापल्या घरी परतले आहेत, असे शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी सांगितले.

शिवाजी महाविद्यालयात मूर्ती व शिल्प संस्थेचे दोन दिवसीय अधिवेशन शुक्रवारपासून सुरू होते. शनिवारी सकाळी ४२ संशोधक पितळखोरा लेणीचा अभ्यास करण्यासाठी गेले होते. सकाळी साडेनऊ वाजेच्या दरम्यान लेणीत प्रवेश करताच मधमाश्यांनी हल्ला चढविल्याने सर्वांनी तेथून पळ काढला. घटनास्थळी डॉ. सीताराम जाधव, डॉ. सदाशिव पाटील व काही ठाकर समाजाच्या लोकांनी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात हलवून उपचार केले.



मध माश्यांपासून बचाव करण्यासाठी साहित्य नेताना स्थानिक ठाकर बांधव.

### जखमी झालेल्यांची नावे

देवीदास राठोड (वय ५५, रा. आबा तांडा), हरी थोरवत (५२, रा. नाशिक), अतुल भोसेकर (५५ रा. नाशिक), जगदीश असुदे (३४ रा. कर्नाटक), माधुरी असूदे (३२, रा. कर्नाटक), सूरज जगताप (४७, रा. नवी मुंबई), डॉ. किरण काळे (४०, रा. सोलापूर), नीता नायक (५७, रा. गोवा), वसुधा देशमुख (३५, रा. डोंबिवली), सलीम खान (५८,रा. मुंबई), डॉ. विजयकुमार भोले (४०, रा. उस्मानाबाद) डॉ. अनिता शिंदे (४५ रा. बीड), हर्ष जावळे (२६, रा. बीड), डॉ. धरमपाळ माशाळकर (४०, रा. सोलापूर), डॉ. संजय हवलदार (३५, रा. इंदोर), शरदचंद्र जैन (५०, रा. नांदेड), माया माशाळकर (३५, रा. सोलापूर) या १७ जणांवर कन्नड ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. तर संदेश कांबळे (४०, रा.औरंगाबाद), अरविंद आचार्य (३९, रा. तमिळनाडू), संजय पाईकराव (४०, रा. औरंगाबाद), संजीवनी मांदळे (३६, रा. औरंगाबाद) यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. संदेश कांबळे व संजय पाईकराव यांना मधमाश्यांनी जास्त प्रमाणात चावा घेतला होता.

Shivaji College Library * Kannad *

epaper.saamana.com
रविवार, दि. २७ मार्च २०२२ सामना

# पितळखोरा लेणीत इतिहास संशोधकावर मधमाशांचा हल्ला ; २५ जखमी

कन्नड, दि. २६ (सा.वा.)- येथील प्रसिद्ध पितळखोरा लेणीत काही अभ्यासक पर्यटक म्हणून गेले असता त्यांच्यावर मधमाशांनी हल्ला केला. या हल्ल्यात २५ जण जखमी झाले असून, त्यापैकी ७ जणांची प्रकृती गंभीर होती. २१ जणांवर ग्रामीण रुग्णालयात तर ४ जणावर जाधव नर्सिंग होममध्ये उपचार करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच आमदार उदयसिंग राजपूत यांनी रुग्णांची भेट घेऊन विचारपूस केली.



शहरातील छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारपासून मूर्ती व शिल्प संशोधन संस्था व छत्रपती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहासाचे दुसरे राष्ट्रीय अधिवेशन भरविण्यात आले आहे. आज शनिवार दुसऱ्या दिवशी सकाळी पितळखोरा येथे प्रत्यक्ष जवळपास ३० संशोधक हे शिल्प व लेणी यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी सकाळी १० वाजेच्या सुमारास गेले होते. यावेळी मधमाशांनी या संशोधक, विद्यार्थी यांच्यावर हल्ला केला यात २५ जण जखमी झाले. यापैकी ७ जण गंभीर जखमी झाले. यात शरदचंद्र जैन (५०) नांदेड, शैलेश सावे (५०) तारापूर, सलीम खान (५९) मुंबई, संजीवनी मादले (३२), संदेश कांबळे (४०), संजय पाईकराव (४०), रा सर्व संभाजीनगर, अरविंद चारिया (३९), हैदराबाद यांचा समावेश आहे. किरकोळ जखमीमध्ये देवीदास राठोड (५५) आंबा तांडा, श्रीहरी थारवन (५२, नाशिक), डॉ. अनिता शिंदे (४५, रा बीड), हर्ष विजय जावळे (२६, बीड), डॉ. संजय हवलदार (३५, इंदौर), माया माशळकर (३५, सोलापूर), डॉ. प्रकाश महाजन (४३, कन्नड), अमोल कांबळे, (२८, सोलापूर), बालाजी शिरसाठ (२९, सोलापूर), वसुधा देशमुख (५५, डोंबीवली), डॉ. किरण काळे, सूरज जगताप (४७, नवी मुंबई), जगदीश आसुरे (३४), माधुरी आसुरे (३२, कर्नाटक), नीता नायक (५७, गोवा), विजयकुमार भांडे (४०, धाराशिव), डर धम्मपाल माशाळकर (४०, सोलापूर), अतुल भोसले (२२, कर्नाटक) आदिंसह समावेश आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच डॉ. सीताराम जाधव, डॉ. सदाशिव पाटील, प्राचार्य विजय भोसले, उपप्राचार्य भाऊसाहेब मगर, डॉ. प्रकाश खेत्री, प्रा. प्रतिभा अहिरे, डॉ. कारभारी भानुसे, शिवसेना विभागप्रमुख सोपान गोलाईत, सोनाजी मोरे, अरुण थोरात, अंबादास अकोलकर, सोमनाथ उघडे, आकाराम आगिवाले सर्व मदतीस धावले, डॉ. सीताराम जाधव व डॉ. सदाशिव पाटील यांनी पितळखोरा लेणी येथे प्राथमिक उपचार करून वरील सर्वांना डॉ. भूषण वानखेडे, डॉ. प्रवीण चव्हाण, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण पवार, डॉ. मनीषा मोतिंगे, डॉ. ऋजुता थोरात, नर्स विजया साळवे, दिव्या नंदी, संध्या गवळी, प्रमिला राठोड, स्वाती डोळस, दादासाहेब गिधे, केशव आघाने, माणिक अघाने, मुरलीधर उघडे व सोमनाथ उघडे आदींनी उपचार केले.

Shivaji College Library Kannad

epaper.saamana.com
मंगळवार, दि. २९ मार्च २०२२ सामना

# हिवरखेडा येथील विशेष शिबिराचा समारोप

कन्नड, दि. २८ (सा.वा.) - शिवाजी महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर व ग्रामपंचायत, हिवरखेडा गवताळा यांच्या संयुक्त विद्यमाने सातदिवसीय विशेष शिबिराचे आयोजन १६ ते २२ मार्च दरम्यान हिवरखेडा गौताळा येथे करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप झाला.

शिबिराच्या समारोप समारंभासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले की, तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना यांच्या उपक्रमाद्वारे होत असते.

शिवाजी महाविद्यालय येथील रासेयो युनिट ग्रामीण भागात येऊन जमीन पातळीवरील प्रश्नांची सोडवणूक करते हीच खरी राष्ट्रसेवा आहे. तसेच स्वयंसेवकांनी इथे शिबिरात राहून मिळालेल्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा स्वतःच्या गावाच्या विकासासाठी करावा असेही ते म्हणाले. हिवरखेडाच्या सरपंच सुमित्रा जाधव यांनी रासेयो स्वयंसेवकांनी गावात जे विविध उपक्रम, अभियान राबविले या बद्दल आभार मानले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. व्ही.एन. भोसले म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना हे व्यक्तिमत्त्व विकासाचे खुले व्यासपीठ आहे. महाविद्यालयीन तरुणांना सामाजिकतेचे भान प्राप्त करून समाजाला उन्नत करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करत असते. ग्रामपातळीवरील विकास साधला तरच राष्ट्रविकास शक्य आहे, असेही ते म्हणाले. प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. अशोक भोसीकर यांनी रासेयोच्या ध्येय उद्दिष्ट व विशेष सात दिवसीय विशेष शिबिराच्या आयोजनाची भूमिका मांडत सातदिवसांतील विविध उपक्रम, पान बंधारा, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, शोषखड्डे, ग्रामसंवाद, सर्वेक्षण, बौद्धिक सत्राची माहिती दिली. डॉक्टर प्रकाश महाजन यांनी अहवाल वाचन केले. रासेयो स्वयंसेवकतर्फे सावन पवार व अंजली दमानिया तर ग्रामस्थाच्या वतीने भारत लवांदे, ज्ञानेश्वर दाभाडे यांनी मनोगत व्यक्त केले. स्वयंसेवक सावंत, पवार, प्रफुल्ल जाधव, गौतम सूर्यवंशी, योगेश चव्हाण, पूजा गायकवाड, अंजली दमानिया यांचे अभिनंदन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. संतोष देशमुख, तर आभार डॉ. मीना वडुळे यांनी मानले. यावेळी रासेयो समितीतील प्रा. बी.जी. देशमुख, प्रा. अलका गडकरी, आर.के. भागवत, मुख्याध्यापक गावंडे आदी उपस्थित होते.

Shivaji College Library
Kannad

सकाळ
औरंगाबाद, बुधवार,
३० मार्च २०२२

## दृष्टिक्षेपात




औरंगाबाद : डॉ. झाडे यांना पुरस्कार प्रदान करताना मान्यवर.

# डॉ. रामचंद्र झाडे यांना जैमिनी कडू पुरस्कार प्रदान

औरंगाबाद : जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे देण्यात येणारे साहित्य क्षेत्रातील विविध पुरस्कार नागपूर येथे रविवारी (ता. २७) मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र झाडे यांना 'प्रा. जैमिनी कडू राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभाचे उद्धाटन प्रसिद्ध मेंदूरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांच्या हस्ते झाले. प्रा. दीपककुमार खोब्रागडे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे हे संत साहित्याचे अभ्यासक आहेत. त्यांच्या 'संत तुकारामाचा साहित्यिक व सांस्कृतिक जनसंवाद' (वैचारिक) या ग्रंथास पुरस्कार देण्यात आला. डॉ. झाडे यांनी भाकर (कथासंग्रह), कवितेच्या वाटा (काव्यसंग्रह), डॉ. वासुदेव मुलाटे गौरवग्रंथ हे ग्रंथ संपादित केले आहे. डॉ. झाडे यांचा 'बाप' हा कवितासंग्रह प्रसिद्ध असून ग्रामीण जीवन व संस्कृतीचाही त्यांचा अभ्यास आहे.

Shivaji College Library
Kannad

सकाळ
औरंगाबाद, गुरुवार, ३१ मार्च २०२२ | १०

# मूर्ती, शिल्प राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता

**कन्नड, ता.३० (बातमीदार)** : तत्कालीन समाज जिवनाचे प्रतिबिंब मूर्ती व शिल्पकलेत पडलेले असते. तत्कालीन समाजजीवन समजून घेण्यासाठी मूर्ती व शिल्पकला समजून घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.श्याम सिरसाठ यांनी व्यक्त केले.

कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात घेण्यात आलेल्या मूर्ती व शिल्प संशोधन संस्थेच्या दुसऱ्या राष्ट्रीय अधिवेशनात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मूर्ती व शिल्पकला हे मानवाच्या उन्नत अवस्थेचे द्योतक आहे. तत्कालीन समाज कोणत्या अवस्थेला पोहचला होता हे अभ्यासण्यासाठी मूर्ती, शिल्पकला महत्त्वाचा कलात्मक दस्तऐवज आहे. विद्यापीठाच्या सर्व ज्ञानशाखेत, आंतरविद्याशाखा म्हणून अभ्यासक्रमात मूर्ती, शिल्पकला विषयाचा अंतर्भाव केला पाहिजे. असेही डॉ. सिरसाठ म्हणाले.



**कन्नड : मूर्ती व शिल्पकला राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ.श्याम सिरसाठ, किशोर शितोळे, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. विजय भोसले, अशोकराव आहेर, प्रा. संजय पाईकराव आदी.**

याप्रसंगी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य किशोर शितोळे, प्रा. धम्मपाल माशाळकर, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. संजय पाईकराव, संदेश कांबळे, प्रा.अतुल भोसीकर, सूरज जगताप, मुर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे अधिक डॉ. झाकीर पठाण, सचिव प्रा. संजय पाईकराव, डॉ. जगदीश भेलोंडे आदींची उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केले. त्यांनी गौरवशाली मुर्ती, शिल्पकलेचा आढावा घेतला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी अशोक अण्णा आहेर होते. सूत्रसंचालन डॉ. के.एल. भानुसे यांनी केले. आभार डॉ. जगदीश भेलोंडे यांनी मानले.

Shivaji College Library Kannad

Shivaji College Library
Kannad

epaper.saamana.com
शुक्रवार, दि. २७ मे २०२२ सामना

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित

## शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड

ता.कन्नड,जि.औरंगाबाद

## शॉर्ट टेंडर किंवा कोटेशन ( निविदा/दरपत्रक )

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता फर्निचर, साहित्य, यंत्रसामग्री, उपकरणे, स्टेशनरी, ग्रंथालय पुस्तके, ग्रंथालय साहित्य, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य व केमिकल, मानसशास्त्र, प्रयोगशाळा साहित्य, ग्रंथालय पुस्तके बायंडिंग करणे, ऑफिस रेकॉर्ड बायंडिंग करणे, विद्यार्थी संसद, गॅदरिंग कार्यक्रमासाठी साहित्य, विद्यार्थी डेव्हल डेस्क, महाविद्यालय बगिचा साहित्य, माहितीपत्रक, प्रवेश अर्ज, ओळखपत्र, नियतकालिक छपाई, महाविद्यालयाअंतर्गत परीक्षा, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, वेगवेगळ्या प्रकारची छपाई विद्यार्थी सहाय्य निधी व विकास निधी साहित्य खरेदी महाविद्यालयाअंतर्गत रस्ता, कपाटे, टेबल, खुर्च्या, फॅन, कूलर, स्टिल बाकडे, रॅक, टेबल रेगझिन, खिडक्यांना स्लायडिंग, दरवाजे दुरुस्ती, कपाटे दुरुस्ती व कलर करणे, विद्युत मटेरियल साहित्य तसेच ग्रंथालयातील पेपर रद्दी, लॅबमधील जुने रेकॉर्डबुक रद्दी, तसेच स्टोअरमधील जुनी रद्दी व तसेच पाण्याच्या फुटलेल्या टाक्या, भंगार इ. पुरवठाधारकांनी किंवा अधिकृत विक्रेता किंवा मान्यता प्राप्त सहकारी भांडार किंवा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या वैध नोंदणीकृत किंवा पंजीकृत पुरवठाधारकांकडून मोहोरबंद (सीलबंद) शॉर्ट टेंडर किंवा कोटेशन (निविदा / दरपत्रके ) दिनांक ३१ मे २०२२ पर्यंत प्राचार्य शिवाजी महाविद्यालय, कन्नड या पत्त्यावर पाठवावीत.

*टीप :* वरील शॉर्ट टेंडर किंवा कोटेशनकरिता वस्तूंचा साहित्यांचा किंवा वरीलप्रमाणे खरेदीचा तपशील कार्यालयात मिळेल. दिनांक ६ जून २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता खरेदी कमिटीच्या बैठकीत वरील सीलबंद कोटेशन फोडून खरेदीचा निर्णय घेण्यात येईल. याबाबत सर्व अधिकार राखून ठेवले आहे.

स्वाक्षरित/
प्राचार्य
**शिवाजी महाविद्यालय, कन्नड**
**ता. कन्नड, जि.औरंगाबाद**

Shivaji College Library
Kannad

पुण्य नगरी
८ रविवार, २२ मे २०२२ | औरंगाबाद

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

## डॉ. भीमराव आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,

### कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

### शॉर्ट टेंडर किंवा कोटेशन (निविदा/दरपत्रक)

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता फर्निचर, साहित्य, यंत्रसामुग्री, उपकरणे, स्टेशनरी, ग्रंथालय पुस्तके, ग्रंथालय साहित्य, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य व केमिकल, मानसशास्त्र, प्रयोगशाळा साहित्य, ग्रंथालय पुस्तके बायंडिंग करणे, ऑफिस रेकॉर्ड बायंडिंग करणे, विद्यार्थी संसद, गॅदरिंग कार्यक्रमासाठी साहित्य, विद्यार्थी डेव्हल डेस्क, महाविद्यालय बगीचा साहित्य, माहितीपत्रक, प्रवेश अर्ज, ओळखपत्र, नियतकालिक छपाई, महाविद्यालयाअंतर्गत परीक्षा, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, वेगवेगळ्या प्रकरची छपाई विद्यार्थी सहाय्य निधी व विकास निधी साहित्य खरेदी महाविद्यालयाअंतर्गत रस्ता, कपाटे, टेबल, खुर्च्या, फॅन, कूलर, स्टील बाकडे, रॅक, टेबल रॅगझिन, खिडक्यांना स्लायडिंग, दरवाजे दुरुस्ती, कपाटे दुरुस्ती व कलर करणे, विद्युत मटेरियल साहित्य तसेच ग्रंथालयातील पेपर रद्दी, लॅबमधील जुने रेकॉर्ड बुक रद्दी, तसेच स्टोअरमधील जुनी रद्दी व तसेच पाण्याच्या फुटलेल्या टाक्या, भंगार इ. पुरवठाधारकांनी किंवा अधिकृत विक्रेता किंवा मान्यताप्राप्त सहकारी भांडार किंवा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या वैध नोंदणीकृत किंवा पंजिकृत पुरवठाधारकांकडून मोहोरबंद ( सीलबंद ) शॉर्ट टेंडर किंवा कोटेशन ( निविदा/ दरपत्रके ) दिनांक २५ मे २०२२ पर्यंत प्राचार्य शिवाजी महाविद्यालय कन्नड या पत्त्यावर पाठवावीत.

**टीप** :- वरील शॉर्ट टेंडर किंवा कोटेशनकरिता वस्तूंचा, साहित्यांचा किंवा वरीलप्रमाणे खरेदीचा तपशील कार्यालयात मिळेल. दिनांक ३० मे २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता खरेदी कमिटीच्या बैठकीत वरील सीलबंद कोटेशन फोडून खरेदीचा निर्णय घेण्यात येईल. याबाबत सर्व अधिकार राखून ठेवले आहे.

स्वाक्षरित/-
प्राचार्य,
डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, कन्नड
ता. कन्नड, जि. औरंगाबाद.